# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १४/०२/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक १४/०२/२००६ रोजी सभा सुचना क्र. २५ दि. ०८/०२/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १०) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ११) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १२) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १३) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १४) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले मा. आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग, मनपा कर्मचारी वर्ग तुम्ही ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाल अशी मी आशा बाळगतो आणि सभेला सुरुवात करावी अशी सचिवांना सुचना करतो.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो की आज नवशक्ती पेपरमध्ये मिरा भाईंदर नोकर भर्तीमध्ये काळेभेरे, आयुक्तांवर संशय अशा पध्दतीची एक बातमी आलेली आहे. या नोकरभर्ती संदर्भात मा. आयुक्त साहेबांवर काळेभेरे असे आरोप केलेले आहेत आणि संशयाचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्याबाबत मा. आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही बातमीचे वाचन करा.

**गजानन भोईर :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बातमीचे वाचन करतो :- कमालीची गोपनीयता बाळगुन मिरा भाईंदरच्या आयुक्तांनी सुरु केलेली नोकरभर्तीची प्रक्रिया संशयास्पद असल्याचा आरोप विविध स्तरातुन होत असुन सदर भरती प्रक्रिया रद्द करण्याची मागणी जोर धरत आहे. पालिका आस्थापनेवरील १५ रखवालदार ५१ मजुर आणि ५ सफाई कामगार अशी ७१ पदे ठाणे सेवायोजन कार्यालयामार्फत भरण्याकरिता पालिका आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड यांनी उमेदवारांची यादी मागवलेली होती. त्यानुसार ६५० उमेदवारांची यादी आयुक्तांकडे पाठविण्यात आली. निवड समितीमार्फत सदर उमेदवारांच्या मुलाखाती दि. १८ फेब्रुवारी रोजी नगरभवन येथे होणार आहे. विशेष म्हणजे या भरती प्रक्रिये संदर्भात कमालीची गुप्तता आयुक्तांकडून पाळण्यात आल्याचे स्वतः महापौर व उपमहापौर साहेब, कोणालाच याचा गंध नव्हता. या भरती प्रक्रियेची कुणकुण उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती यांना लागताच त्यांनी उपायुक्त (मु.) श्री. बालाजी खतगावकर यांना चांगलेच फटकारले.

तसेच मा. आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड यांची भेट घेऊन स्थानिकांना डावलुन सुरु करण्यात आलेली भरती प्रक्रिया संशयास्पद असल्याने त्यांनी ती त्वरीत रद्द करण्याची मागणी केली. त्यासोबत स्थायी समिती सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे, नगरसेवक अशोक पाटील हे उपस्थित होते. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा अध्यक्ष श्री. मोहन पाटील, नगरसवेक ध्रुवकिशोर पाटील व श्री. प्रकाश दुबोले यांनी सदर भरती संशयास्पद असल्याचा आरोप केला आहे. शिवसेनेचे उप-शहरप्रमुख श्री. धनेश पाटील यांनी ही नोकर भरती प्रक्रिया संशयास्पद असल्याचे आणि त्याच्यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे नाकारता येत नसल्याने ही भरती रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, ही भरती चालू आहे का?

**मा. आयुक्त :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका नोकर भरतीमध्ये काळेभेरे अशा आशयाची नवशक्ती पेपरमध्ये जी बातमी आलेली आहे. मी त्या बातमीच्याबाबतीत खुलासा करु इच्छितो की, बातमीमध्ये सुरुवातीला पालिका आस्थापनेवर १५ रखवालदार, ५१ मजुर आणि ५ सफाई कामगार अशी ७१ पदे ठाणे सेवा योजन कार्यालयामार्फत पालिका आयुक्तांनी उमेदवारांची यादी मागवलेली होती. त्यानुसार ६५० इच्छुक उमेदवारांची यादी आयुक्तांकडे पाठविण्यांत आली. निवड समितीमार्फत सदर उमेदवारांच्या मुलाखाती दि. १८ फेब्रुवारी रोजी नगरभवन येथे होणार आहेत. विशेष म्हणजे या भरती संदर्भात कमालीची गुप्तता आयुक्तांकडून पाळण्यांत आल्याने स्वतः महापौर आणि उपमहापौर कोणालाच याचा गंध नव्हता. मी याबाबतीत सभागृहाला असे सांगु इच्छितो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या अंतर्गत कायद्याप्रमाणे जी काही ५३ कलमखाली कार्यवाही करणे आवश्यक होते किंवा मा. आयुक्तांना जे काही अधिकार आहेत, त्याबाबत आस्थापनेमध्ये असलेल्या रिक्त पदांच्या बाबतीत संपूर्ण आढावा घेतलेला होता. आस्थापनेवर जवळजवळ ४५० पदे रिक्त आहेत. अशा प्रकारची रिक्त पदे भरण्याचा प्रक्रियेसाठी मा. आयुक्त साहेबांना जे अधिकार आहेत त्या अधिकारांचा वापर करुन सेवा योजन कार्यालयामध्ये मागवलेली यादी हे गुपीत राहू शकत नाही आणि हा गुपीत भाग आहे असे मला वाटत नाही.

**केशव घरत :-**

५३८ सफाई कामगार होते. त्यांचे काय झाले?

**मा. आयुक्त :-**

५३८ सफाई कामगारांबाबत पूर्वीच्या नगरपालिकेने आणि आताच्या विद्यमान महानगरपालिकेने जे ठराव केलेले आहेत. प्रशासनाने त्या ठरावाची अंमलबजावणी सुरु केलेली आहे. त्याप्रमाणे ५३८ सफाई कामगारांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही आता जी भरती सुरु करत आहात. त्या पदांना शासनाची मंजूरी आहे का?

**मा. आयुक्त :-**

ही आस्थापनेवरची पदे मंजूर आहेत.

**जयंत पाटील :-**

तुम्ही या संबंधाची निविदा वर्तमानपत्रामध्ये पाठवलेली होती का?

**मा. आयुक्त :-**

आम्ही वर्तमानपत्रामध्ये निविदा पाठवलेली नाही. कारण या उमेदवारांची यादी सेवा योजन कार्यालयाकडून मागवलेली आहे.

**जयंत पाटील :-**

आपण यादी मागवलेली आहे हे बरोबर आहे. परंतु, आपण वर्तमानपत्रामध्ये बातमी किंवा निविदा दिलेली आहे का? आमच्या महापालिकेला एवढ्या-एवढ्या पदांची आवश्यकता आहे असे कळवलेले आहे का? अशा तऱ्हेच्या गोष्टीची तुमच्या शिवाय शहरातील इतर नगरसेवकांना कल्पना नाही हे अयोग्य आहे.

**मा. आयुक्त :-**

शासनाने जे धोरण ठरविलेले आहे. आपण त्या धोरणानुसार जाणार आहोत. तुमच्या म्हणण्यानुसार अशा पदांची भरती करताना आपण कायद्यामधील अधिकारांचा वापर करुन अशाप्रकारची कार्यवाही करत असु तर त्याच्यामध्ये काय गैर आहे? ते मला समजत नाही. तुमचे नेमके काय म्हणणे आहे ते सांगा?

**जयंत पाटील :-**

आम्ही या शहरातील लोकप्रतिनिधी आहोत. तसेच, या महापालिकेत एकूण ८४ लोकप्रतिनिधी आहेत. त्यातील कुठल्याही लोकप्रतिनिधीला या विषयाची कल्पना नाही आणि हा विषय आलेलासुध्दा नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण या गोष्टीची कल्पना देणे आवश्यक आहे. हे बरोबर आहे.

**जयंत पाटील :-**

या गोष्टीची कल्पना निश्चितच द्यायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

म्हणजे नक्की काय करायला पाहिजे?

**जयंत पाटील :-**

या शहरातील नगरसेवकांची प्रत्येक वेळेला अशी भवना आहे की, स्थानिक लोकांना प्राधान्य द्यायला पाहिजे. कदाचित तुमची व्याख्या वेगळी असु शकते.

**केशव घरत :-**

साहेब, जर जाहिरात दिली असती तर सोयीस्कर झाले असते.

**गजानन भोईर :-**

मिरा भाईंदरमध्ये बेरोजगार मुलांची नोंद घेतली तर असे एकूण दोन हजार बेरोजगार मुले असण्याची संभावना आहे. परंतु, या दोन हजार बेरोजगार मुलांपैकी एकाही मुलाला कॉल आलेला नाही. त्यांचे दहा-दहा वर्षाचे एम्प्लॉयमेन्ट कार्ड आहे. जर तुम्ही ही बातमी पेपरला दिली असती तर स्थानिक मुलांना नोकरी मिळाली असती.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, नोकरीसाठी स्थानिक लोकांना प्राधान्य देण्याबाबत मागच्या वेळेच्या महासभेत ठरले होते. तुम्ही जी यादी मागितली, ते मिरा भाईंदर क्षेत्रातील ज्यांचे अर्ज आहेत किंवा ज्यांची दहा-दहा वर्षापासुनचे ॲप्लीकेशन पेन्डीग आहेत त्याच्यापैकी जर मिरा भाईंदरचे उमेदवार पाठवले असते तर स्थानिकांना रोजगार मिळाला असता. आता या भरतीमध्ये बाहेरचे उमेदवार येतील. त्यामुळे तुम्ही मिरा भाईंदरचे उमेदवार घेण्याबाबतची टीप द्या. आम्ही बाहेरच्या लोकांचा किती बोजा सहन करायचा? तेच समजत नाही. तुम्ही मिरा भाईंदर क्षेत्रातील उमेदवार घेण्याबाबत टीप दिली असती तर हे उमेदवार एम्प्लॉयमेन्टकडून आले असते तरी चालले असते आणि स्थानिक लोकांना प्राधान्य मिळाले असते.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही मिरा भाईंदर क्षेत्रातील उमेदवार घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण आता एम्प्लायमेन्टप्रमाणे भरती करण्याबाबतची उमेदवारांची जी यादी मागवलेली आहे. त्यांनी ते एम्प्लॉयमेन्ट कार्ड कुठल्या वर्षी काढलेले आहे? त्याचा तपशिल द्या. त्या उमेदवारांचे एम्प्लॉयमेन्ट कार्ड दहा वर्षे जुने आहे की तीन वर्षे जुने आहे ते आम्हाला कळेल.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, आता नगरपालिकेची महानगरपालिका झालेली आहे. महानगरपालिका स्थापन झाली असतानासुध्दा प्रत्येक वेळेला स्थानिकांना नोकरभरतीमध्ये डावलले गेलेले आहे. मागच्या वेळेला १४८ उमेदवारांची नोकर भरती झाली त्यावेळेला महापालिका हद्दीतील स्थानिक उमेदवारांना डावलले गेलेले आहे. मा. महापौर श्रीम. मायरा मेन्डोसा यांच्या माध्यमातुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक उमेदवारांना नोकरभरतीमध्ये प्राधान्य देण्याबाबतचा ठराव झालेला आहे आणि तो ठराव महासभेमध्ये मंजूर झालेला आहे. त्या ठरावाच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधीची जी भावना आहे. तुम्ही ती भावना लक्षात घ्या. आज मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सुशिक्षित बेरोजगार उमेदवार आहेत ते तिथल्या तिथे आहेत. आज बाहेरुन येणाऱ्या उमेदवारांना कामे मिळतात आणि आमच्या महापालिका क्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना कामे नाहीत. आमच्याकडे हे उमेदवार फक्त खेपा मारत असतात हे योग नाही. तुम्ही आमची भावना लक्षात घ्या. तुम्ही आजची नोकरभरती त्वरीत थांबवा. आपण एम्प्लॉयमेन्टतर्फे नोकरभरती करणार आहोत असे तुम्ही आताच सांगितलेले आहे. तुम्ही ती नोकरभरती एम्प्लॉयमेन्टतर्फे घ्यावी असे माझे म्हणणे आहे. तुम्ही मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उमेदवार घ्या. अशी आमच्या सर्व लोकप्रतिनिधींची भावना आहे.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, तुमच्या भावनेशी सहमत आहोत. मा. आयुक्त साहेबांना तसे अधिकार दिलेले आहेत. आम्ही सगळे मान्य करतो. परंतु, आम्ही या ठिकाणी स्थानिक उमेदवार असल्याचे सांगतो. कारण आम्ही या भुमीशी निगडीत आहोत, या मातीशी निगडीत आहोत. मा. आयुक्त साहेब, तुम्हीसुध्दा या मातीत आलेले असल्यामुळे तुम्ही या शहराच्या मानसिकतेचा थोडाफार विचार करावा असे मला वाटते. मी या शहराचा कुणीतरी आहे असा विचार करा. आमच्या भावनेचासुध्दा विचार करा. जर आम्ही आमच्या स्थानिक लोकांसाठी किंवा आमच्या लोकांसाठी भांडलो तर तुमचीसुध्दा तशी मानसिकता व्हायला हरकत नाही. असे मला वाटते. तुम्ही पेपर डिक्लेअर नाही केले तरी चालतील. तुम्ही शहरामध्ये बॅनर नाही लावले तरी चालतील. तुम्ही आम्हाला दोन ओळींची सुचना दिली असती तरी चालली असती. जर तुम्ही शहरातील लोकप्रतिनिधींना हे-हे काम करतो असे सांगितले असते तर आम्ही आमचा एक माणूस प्रपोज केला असता. आम्ही या सेवा योजनामध्ये कार्ड देणाऱ्या कार्डधारकांशी संपर्क साधला असता. तुम्हाला सेवायोजन कार्यालयाच्या माणसाची आवश्यकता आहे. आपण असा पर्याय देऊनसुध्दा हे काम करु शकतो. परंतु, तुम्ही त्यासाठी सेवा योजना कार्यालयाशी संपर्क करणे आवश्यक आहे.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, नवशक्ती पेपरचे जे बातमीदार आहे त्यांनी काल आमच्याबरोबर संपर्क साधलेला होता. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये अशी भरती होते का? याबाबत त्यांनी विचारणा केलेली होती. मी त्यांना भरती संदर्भात माहिती नसल्याचे सांगितले. खरे म्हणजे मला या नोकरभरती संदर्भात काहीही माहिती नव्हते. त्या अनुषंगाने माझेसुध्दा नाव आज त्या बातमीमध्ये आलेले आहे. आपल्याकडे प्रत्येक वेळेला भरतीचा विषय असतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जनसंख्या सुमारे ५ लाख २१ हजार आहे. त्याच्यामध्ये प्रामुख्याने स्थानिक म्हणजे आम्ही लोक आहोत. मिरा भाईंदरमध्ये स्थानिक म्हणजे जी लोक मिरा भाईंदरमध्ये वीस-पंचविस वर्षापासुन राहणारे आहेत ती लोक.

**रतन पाटील :-**

स्थानिक म्हणजे वीस-पंचविस वर्षापासुन राहणारी लोक आणि जी लोक पिढ्यान पिढ्या राहतात ती लोक.

**मोहन पाटील :-**

या स्थानिक लोकांच्या अशा भावना आहेत की या सदनामध्ये या सभागृहाच्या माध्यमातुन आम्ही पालिकेमध्ये जे नगरसेवक पाठवलेले आहेत त्यांच्या माध्यमातुन एका उमेदवाराची तरी शिफारस व्हायला पाहिजे. आम्ही मा. महापौरांशी चर्चा केली. परंतु, मा. महापौरांना विषय माहित नाही. मा. उपमहापौरांनी नोकरभरतीबाबत चौकशी करण्यासाठी माझ्याशी दुरध्वनीद्वारे संपर्क साधलेला होता. त्यांनी याबाबत मला काही माहिती आहे का? ते विचारले होते. परंतु, मला काहीही माहित नव्हते. अशा प्रकारे ही बातमी या ठिकाणी आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपलिका अधिनियम १९४९ नुसार नोकरभरतीबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त साहेबांचे आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माध्यमातुन बरीच नावे सेवायोजन कार्यालयामध्ये गेलेली आहेत. त्या उमेदवारांना नोकरी मिळावी म्हणून ते उमेदवार मागच्या टर्मपासून नगरसेवकांशी संपर्क साधत आहेत. काही उमेदवारांची पाच वर्षापूर्वीची नावे आहेत, काही उमेदवारांची दहा वर्षापूर्वीची नावे आहेत, काही उमेदवारांची पंधरा वर्षापूर्वीची नावे आहेत, काही उमेदवारांनी रिन्यु न केल्यामुळे ती नावे तशीच गेलेली आहेत.

**रतन पाटील :-**

एम्प्लॉयमेन्टमध्ये अशी शंभर नावे आहेत.

**मोहन पाटील :-**

आम्ही अशा पध्दतीने नावे दिलेली आहेत. आम्ही त्या नावांना मंजूरी दिलेली आहे. त्याला मंजुरीचा प्रश्न येत नाही. जेव्हा आम्ही स्टाफ पॅटर्न मंजूर करुन घेतो त्यावेळेला त्याला कुठल्याही सभागृहाची मंजूरी असावी लागते. आपल्याला जेव्हा या नोकरभरतीची आवश्यकता असते किंवा ही नोकरभरती करण्याची आवश्यकता असताना प्रशासन त्याच्यावर कार्यवाही करते आणि सेवायोजन कार्यालय त्यांना तशा पध्दतीने कळविते. हे कळविण्यापूर्वी आपण सदनामध्ये असलेल्या पदाधिका-यांशी संपर्क साधला किंवा त्यांना विश्वासात घेण्याचा विषय नाही. कारण तुमचा तो पूर्णपणे अधिकार आहे. परंतु, आपण आल्यापासून किंवा आपल्या अगोदर असलेले मुख्याधिकारी किंवा कमिशनर किंवा आयुक्त साहेब यांच्याकडे आमची माणसे भरती केली पाहिजे असा नेहमी प्रश्न असायचा.मागच्यावेळेला जी पन्नास माणसे भरायची होती त्यावेळेला या सभागृहातील लोकांनी आमची दोन-तीन माणसे दिली पाहिजे असे सांगितलेले होते. आम्ही याबाबत आस्थापनेकडे संपर्क साधलेला होता. परंतु, आस्थापना विभाग बोलतो की आम्ही याच्यावर काहीही कार्यवाही केलेली नाही. जेव्हा एखादा ठराव केला तेव्हा आम्हाला असे वाटले की या सभागृहातील दोन-दोन स्थानिक लोकांची गरज आहे आणि लोकांना अशी अपेक्षा होती. परंतु, हे न होता याच्यावर कार्यवाही झाली नाही. मुळात हा ठराव होऊन कार्यवाही झाली नाही लोकांना नोकरभरतीची जाणीव झाली. पत्रकार काय लिहितो? किंवा पत्रकाराच्या प्रत्येक बातमीवर वस्तुस्थिती आहे असे बोलून चालत नाही. त्याचा खुलासा प्रशासन किंवा बॉडीने करावा लागतो. जर या ८४ नगरसेवकांमध्ये एकाचाही माणूस लागत नसेल किंवा एकही माणूस संपर्कात येत नसेल तर उपयोग नाही. आज या ठिकाणी ८० नगरसेवक उपस्थित आहेत. आम्ही ८० नगरसेवकांपैकी ८० लोकांना लावावे असे आम्ही मान्य करीत नाही. पाच-पंचवीस लोकांपैकी एखादा माणूस कामाला लागला तर आम्ही या ठिकाणी एका माणसाला नोकरी दिली याचे त्याला समाधान होईल अशी भावना या सभागृहाची आहे. पेपरला न्युज आली तेव्हा आम्हाला एका पत्रकाराने विचारले होते. आम्हाला त्याची कल्पना नव्हती. आपण आम्हाला कल्पना दिली पाहिजे हे आपल्याला कम्प्लसरी नाही. परंतु, ही माहिती नसल्या कारणाने हा विषय अचानक आल्यानंतर विषय आला. कारण पन्नास लोकांची भरती झालेली नाही. आणि हा विषय पुन्हा आला. अशाप्रकारची वेगवेगळी नगरसेवकांची भावना निर्माण झाल्यामुळे हा विषय या पध्दतीने आलेला आहे. यापुढे होणारी भरती करताना तुमची जी प्रतिक्षा यादी येते त्या प्रतिक्षा यादीमध्ये ही नावे क्रमवार आलेली आहेत का? हे बघणे आवश्यक आहे. आपण आजुन एक प्रतिक्षा यादी मागवतो. जर त्या प्रतिक्षा यादीमध्ये नावांचे जम्पिंग झालेले असेल तर वेगळा विषय आहे. मा. आयुक्त साहेब, आम्ही या सभागृहाला अविश्वास दाखविण्याचा प्रश्न येत नाही. प्रत्येक सदस्य बोलला की, आमचा एकतरी उमेदवार लागला पाहिजे ही कळकळ आहे. मी या ठिकाणी तीन टर्मपासून आहे. आम्ही तीन टर्ममध्ये या ठिकाणी दोन माणसे लावू शकत

नाही. मग आपल्याला लोक काय बोलणार? लोक बोलतील की आम्ही तुम्हाला सभागृहामध्ये पाठवलेले आहे. तुम्ही लोकप्रतिनिधी म्हणून काय काम करता अशा प्रकारची लोकांची एक भावना निर्माण होते. समजा, एका टर्ममध्ये किमान एक-दोन माणसे लागली तर लोकांना बरे वाटेल. त्यामुळे माझी मा. आयुक्त साहेबांना सर्वांच्या वतीने अशी विनंती आहे की अशी भरती होताना आपण प्रतिक्षा यादी मागवलेली आहे. त्याच्यामध्ये या काही लोकांची नावे समाविष्ठ नसतील तर ती नावे समाविष्ठ होण्यासाठी काय करावे लागेल आणि काय करण्यात यावे याचे कुशल मार्गदर्शन तुम्ही आम्हाला द्यावे. तुम्ही आम्हाला सांगा की अशा पध्दतीने करता येईल. सर्व नगरसेवकांची तिच इच्छा आहे. कोणाला तरी कामाला लावले पाहिजे अशी नगरसेवकांची इच्छा आहे. त्याच्यामध्ये प्रश्न निर्माण होणार नाही. म्हणून तुम्ही आम्हाला याबाबतीत मार्गदर्शन करावे. जर या प्रतिक्षा यादीमध्ये नावे आली नसतील तर तुम्ही आम्हाला सांगा. आता सन्मा. सदस्य रतन पाटील बोलले की, प्रतिक्षा यादीमध्ये शंभर लोकांची नावे दिलेली आहेत. परंतु, आम्हाला त्याच्यात नावे आलेली दिसत नाहीत. आपण काही वेळेला बोललो की विशिष्ठ सालात म्हणजे सन १९९० नंतर सन १९९१ ची, सन १९९१ नंतर सन २००१, सन २००१ नंतर सन २००३ अशी ती यादी आहे. काही लोकांची यादी येत नाही. आपण त्यासाठी काय केले पाहिजे? याचे आम्हाला मार्गदर्शन लाभले तर योग्य होईल असे आम्हाला बोलायचे आहे. म्हणून मी तुम्हाला एक प्रकारे सुचना करीत आहे. सर्व सन्मा. सदस्यांनी त्या सुचनेचा विचार करावा एवढेच मला बोलायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी सभागृहामध्ये नोकरभरतीबाबत जे निवेदन केलेले आहे. मी त्या संदर्भात असा खुलासा करु इच्छितो की, प्रशासनाने जे पत्र पाठविलेले होते. त्या पत्रामध्ये आपल्या भावनांची कदर केली जाईल. हे सर्व माझ्या पूर्वी लक्षात होते, आजही लक्षात आहे आणि याच्यापुढेसुध्दा लक्षात राहील. शेवटी प्रत्येकाला असे वाटते की स्थानिक म्हणजे आपल्या शहरात असलेली मुले. मी तुमच्या मताशी १०० टक्के सहमत आहे. परंतु स्थानिकच्याबाबतीत शासनाच्या ज्या सुचना आणि मार्गदर्शक तत्वे आहेत. त्याप्रमाणे आपण आणि प्रशासन कार्यवाही करीत असतो. परंतु, आपल्या भावना लक्षात घेऊन जो सहाय्यक संचालक रोजगार आणि स्वयंरोजगार जिल्हा सेवायोजन कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवलेला होता. मी त्या पत्रामध्ये याबाबतीत असा उल्लेख केलेला होता :- सदर पत्रासाठी यादी पाठविताना स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यांत यावे. मी माझ्याकडून त्यांना कळविलेले आहे. त्याप्रमाणे त्यांनी जी यादी पाठविलेली आहे. त्या यादीमध्ये जे कोणी स्थानिक असतील आपण त्यांना मुलाखातीसाठी प्राधान्य देऊ. आपल्याकडे प्राप्त झालेल्या यादीमध्ये आपण स्थानिकांना प्राधान्य देऊ.

**सुर्यकांत भोईर :-**

जर कॉल आला नाही तर मुलाखात कशी होईल?

**मोहन पाटील :-**

आपण प्रतिक्षा यादीमध्ये जम्प करु शकतो. आपण प्रतिक्षा यादीमध्ये आपल्या इकडची नावे घेऊ शकतो. आपण जम्प करु शकतो. म्हणजे तुम्ही आम्हाला सहकार्य करु शकता. जी नावे आलेली नाहीत आपण ती नावे घेऊ. परंतु, प्रतिक्षा यादीमध्ये काही लोकांची नावे आली नाहीत आणि पुढच्या यादीमध्ये नावे असतील तर आपण ती नावे त्या पध्दतीने प्रतिक्षा यादीमध्ये ॲडजेस्ट करु शकतो. महाराष्ट्र किंवा या ठिकाणी जो माणूस पंधरा वर्षे वास्तव्य करतो, तो स्थानिक आहे. याबाबत साशंकता नाही. परंतु, या ठिकाणी अशी मंडळी आहेत की ते मुळ रहिवाशी आहेत. त्यांना पंचविस-तीस वर्षे झालेली आहेत. आम्हीसुध्दा मुळ रहिवाशी आहोत. हा विषय वेगळा झाला. परंतु, जी काही मंडळी समजा सन्मा. सदस्या कैलासबेन जानी आहेत. त्यांचे मुळ गांव राजस्थान वगैरे असु शकते. त्यांनी या ठिकाणी तीस-चाळीस वर्षे वास्ताव्य केलेले आहे. त्या लोकांना संधी मिळाली पाहिजे अशी आमची भावना आहे.

**जयंत पाटील :-**

आता आपल्याकडे जी लिस्ट आलेली आहे. त्याच्यामध्ये भाईंदरचे किती उमेदवार आहेत? तुम्ही त्याचे बायफर्गेशन केलेले नसेल. शासनाचा स्थानिकचा निकष आम्हाला मंजुर आहे. शासनाचा निकष पंधरा वर्षे महाराष्ट्रामध्ये वास्तव्य करण्याबाबतचा आहे. आम्ही स्थानिक मागणी करण्यामागे महत्वाचा असा भाग आहे की जेव्हा दि. २६ जुलैला पावसाचा प्रलय झाला होता तेव्हा मी एका अधिकाऱ्याला फोन केलेला होता. त्या अधिकाऱ्यांना असे-असे पाणी साचल्याबाबत सांगितलेले होते. परंतु, तो अधिकारी दुसरीकडे अडकलेला होता. तो आरोग्याचा अधिकारी वज्रेश्वरीच्या पुढे राहत होता. अशावेळेला तुम्हाला स्थानिक लोकांचा उपयोग जास्त प्रमाणात होतो. स्थानिक लोक या शहरात राहतात ते या शहरातील सुखदुःखाशी निगडीत आहे. हे शहर सुंदर व्हावे ही स्थानिक लोकांची वेगळी कल्पना असेल आणि बाहेरुन येणाऱ्याची वेगळी कल्पना असु शकेल. त्या उमेदवाराला मी या शहरात राहत नाही, मला या शहराशी देण-घेणं नाही, मला महिन्याला पगार मिळतो बस आहे असे त्याला वाटत असेल. आम्ही स्थानिक उमेदवाराची मागणी करण्याचा हा एक मोठा भाग आहे. स्थानिक उमेदवाराचे ह्या शहरावर, या मातीवर प्रेम आहे. शासनाचा काहीही नियम असला तरी मी तुम्हाला एकच उदाहरण देईन की जेव्हा केंद्र सरकारमध्ये भरती होती आणि जेव्हा शिवसेनेने कल्याण रेल्वे स्टेशनवर रेल्वे भरतीसाठी हैदोस घातला तेव्हा शिवसेनेवाल्यांना तिथे बोलावले गेले. त्यांच्या मागण्या मान्य केल्या गेल्या.

आपल्याला कधी-कधी नियम बाजुला ठेवावे लागतात. तुम्ही स्थानिकांना निश्चितपणे प्राधान्य द्या. मला एम्प्लॉयमेन्ट एक्सचेंजची पध्दती माहिती आहे. तुमचा एम्प्लॉयमेन्ट एक्सेचेंजचा एखादा अधिकारी ओळखीचा असेल तर त्या अधिका-याची माणसे पुढे ढकलली जातात. आपल्याकडे पैशाशिवाय काहीही होत नाही.

**गजानन भोईर :-**

ज्यांनी दोन-तीन वर्षापूर्वी एम्प्लॉयमेन्ट कार्ड काढलेले आहे याच्यामध्ये त्याचेसुध्दा नाव आलेले आहे. आपल्याकडे पंधरा-पंधरा वर्षापासून असलेल्या लोकांची नावे आलेली नाहीत. तुम्ही सर्व उमेदवार सिरियलप्रमाणे घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही संपूर्ण मिरा भाईंदरच्या उमेदवारांची लिस्ट मागवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

सेवायोजन कार्यालयामधून फक्त मिरा भाईंदर शहरातील लोकांना प्राधान्य देण्यांत यावे आणि मिरा भाईंदर शहरातील लोकांची लिस्ट मागवा.

**मिलन पाटील :-**

आम्ही एवढे पोटतिडिकीने बोलतो की, सफाईच्याबाबतीत जे अधिकारी आहेत ते आजसुध्दा वेळेवर येत नाहीत. बाहेरचे लोक कल्याण, अंबरनाथवरुन आम्हाला त्याच्याशी काहीही मतलब नाही. परंतु, आज त्या लोकांनी आमच्या ड्युटीसाठी वेळेवर हजर राहणे आवश्यक आहे. आज एकही अधिकारी वेळेवर येत नाही. आणि बाहेरुन येणार एकही अधिकारी ऑफिसमध्ये वेळेवर येत नाही. यासाठी आम्ही स्थानिक उमेदवारांची मागणी करतो.

**गजानन भोईर :-**

साहेब, तुम्ही भरतीबाबत लोकल पेपरमध्ये जाहिरात द्या. जर सात वर्षापूर्वीचे ज्यांचे एम्प्लॉयमेन्ट कार्ड आहे त्यांनी महानगरपालिकेशी संपर्क साधावा अशी जाहिरात दिली तर हजारो लोकं येतील.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही सॅनेटरी इन्स्पेक्टरना विचारा त्यांची ७ वाजताची ड्युटी असते. ते किती लोक हजेरी घ्यायला येतात. त्यांची ती जबाबदारी आहे. किती लोक येतात? ते तुम्ही त्यांना स्वतः विचारा.

**प्रभात पाटील :-**

या शहराचे नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर करण्यासाठी येथील स्थानिक कर्मचा-यांचा फार मोठा सहभाग आहे हे आपल्याला विसरुन चालणार नाही. येथील स्थानिक कर्मचा-याने ग्रामपंचायतीपासून ही पालिका वर आणलेली आहे. मला स्थानिकांबाबत चांगला अनुभव आहे.

**मिलन पाटील :-**

श्री. चाळके सकाळी ११.०० वाजता येतात. श्री. चाळके आहेत का? विचारले तर साईटवर आहेत असे बोलण्यासाठी त्यांनी कर्मचा-याला अगोदर सांगितलेले असते.

**प्रभात पाटील :-**

इथल्या ग्रामपंचायतीपासून महानगरपालिकेत रुपांतर करण्यामध्ये स्थानिक कर्मचा-यांचा फार मोठा वाटा आहे ही गोष्ट कोणीच नाकारणार नाही. ह्या लोकांनी दिवसरात्र काम केलेले आहे हे विसरुन चालणार नाही. म्हणून ह्या पालिकेतील प्रत्येक नगरसेवक प्रमोशन आणि इतर गोष्टींसाठी जेव्हा जेव्हा आवाज उठवितात त्याच्यामागे हे कारण आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण हा विषय पेन्डिग ठेवूया आणि दुसरा विषय घेऊया.

**सुर्यकांत भोईर :-**

जोपर्यंत मिरा भाईंदरला प्राधान्य देत नाही तोपर्यंत हा विषय द्यायचा नाही. हा विषय पेन्डिग ठेवा नाहीतर आम्ही सर्व पक्षीय मोर्चा काढू.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्ही एकाही उमेदवाराला इन्टरव्ह्युला यायला देणार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्ही बाहेर बोर्ड लावू.

**केशव घरत :-**

या इंटरव्ह्युच्या दिवशी आम्ही एकालाही आतमध्ये यायला देणार नाही.

**प्रभात पाटील :-**

सर्वपक्षीने भरती होऊ देणार नाही. असा ठराव मांडा.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, तुमच्या माहितीसाठी सांगतो की चार वर्षापूर्वी असाच मोर्चा ठाणे कलेक्टर ऑफिसवर गेलेला होता. शिक्षण भरतीमध्ये जेव्हा बाहेरची लोक भरती करायचे. त्या विषयावर

कलेक्टरने स्वतः विचार करुन आता बाहेरची लोक भरती करु देत नाही. प्रथम स्थानिक लोकांना प्राधान्य दिलेले आहे. नंतर बाहेरच्या लोकांना प्राधान्य दिले. तसेच आता करा.

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे एकूण किती लोकांची रिक्वायरमेन्ट आहे? ते सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सोा.) :-**

आपल्या आस्थापनेवर एकूण शासन मंजूर पदे १९०४ आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, त्याचे बायफर्गेशन द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सोा.) :-**

याठिकाणी तेवढे डिटेल उपलब्ध नाही. मी तुम्हाला ढोबळ सांगतो की, भरलेली पदे १३७९ आहेत. साधारण रिक्त पदे ५२५ आहेत.

**मोहन पाटील :-**

रिक्त असलेल्या पदांमध्ये कुठल्या पदांचा समावेश होतो त्याची माहिती द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सोा.) :-**

आपण जो विषय चर्चेसाठी घेतलेला आहे त्याचा साधारणपणे ७० पदांचा तपशील आहे. त्यात वर्ग-४ चे रखवालदार, मजूर आणि सफाई कामगार आहेत.

**मोहन पाटील :-**

७० पदांमधील वर्ग-४ची एकूण किती पदे आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सोा.) :-**

सर्व ७० पदे वर्ग-४ची आहेत.

**मोहन पाटील :-**

ही सगळी खुल्या प्रवर्गातील पदे आहेत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.)) :-**

ही सर्व पदे खुल्या प्रवर्गातील आहेत. आपण संपूर्ण अनुशेष भरलेला होता.

**रतन पाटील :-**

आपण मागच्या वेळेला १४८ पदे मागासवर्गीय अनुशेषमधून भरलेली होती.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सोा.) :-**

त्यावेळेला खुली पदे भरलेली नव्हती.

**रतन पाटील :-**

आताची सर्व पदे खुल्या प्रवर्गातील आहेत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सोा.) :-**

सगळी पदे खुल्या प्रवर्गातील आहेत.

**मोहन पाटील :-**

सगळी पदे खुल्या प्रवर्गातील आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

आता अनेक लोक लागतील.

**ग्रिटा फॅरो :-**

आपण त्यांना प्राधान्य देत आहोत.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, जर असे होत असेल तर आपण १८ तारखेला सर्व पक्षीय तिकडे जाऊया.

**सुर्यकांत भोईर :-**

श्री. बालाजी खतगांवकर साहेब, या उमेदवारांच्या मुलाखाती कधी ठेवलेल्या आहेत.

**ज्युडी डिसोझा :-**

या उमेदवारांच्या मुलाखाती १८ तारखेला ठेवलेल्या आहेत.

**केशव घरत :-**

आपण मुलाखाती व्हायला द्यायच्या नाहीत.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्ही मुलाखाती होऊ देणार नाही.

**गजानन भोईर :-**

तुम्ही पक्ष वगैरे बघू नका.  आपले स्थानिक लोक लागले पाहिजेत. तुम्ही सिरियलप्रमाणे उमेदवार घ्या. तुम्ही कोणाच्या ओळखीचे उमेदवार घ्या असे आम्ही तुम्हाला सांगत नाही.

**प्रभात पाटील :-**

संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये जेवढे नोंदणीकृत उमेदवार आहेत तुम्ही त्यांची यादी मागवा. ते सर्व उमेदवार मिरा भाईंदर क्षेत्रातील असावेत.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही मिरा भाईंदर क्षेत्रातील उमेदवारांची यादी मागवा.

**गजानन भोईर :-**

तुम्ही पेपरला ॲड दिली तर मिरा भाईंदर क्षेत्रातील हजारो उमेदवार येतील.

**सुर्यकांत भोईर :-**

मिरा भाईंदरचे हजारो उमेदवारांची नांवे एम्प्लॉयमेन्टमध्ये नोंदलेली आहेत. आणि ते उमेदवार बेरोजगार होऊन पडलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

ज्यांनी एम्प्लॉयमेन्टमध्ये पंधरा वर्षापूर्वी नोंद केली असेल त्याला प्रथम प्राधान्य द्या. तुम्ही अशा उमेदवारांना सिरियलप्रमाणे घ्या.

**गजानन भोईर :-**

तुम्ही उमेदवारांना सिरियलप्रमाणे घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही उमेदवारांची नावे सरियिलप्रमाणे घ्या.

**प्रभात पाटील :-**

ज्या-ज्या मुलांनी एम्प्लॉयमेन्टच्या यादीमध्ये नाव नोंदलेले आहे, तुम्ही त्यांची लिस्ट मागवा.

**मिलन पाटील :-**

तुम्ही एम्प्लॉयमेन्टच्या लिस्टप्रमाणे प्राधान्य क्रमांक ठरवा.

**सुर्यकांत भोईर :-**

मी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो की आपण येत्या १८ तारखेला सर्व सन्मा. सदस्यांनी मुलाखातीच्या ठिकाणी मोर्चा न्यायचा. आपण त्या उमेदवारांच्या मुलाखाती होऊ द्यायच्या नाहीत.

**मिलन पाटील :-**

आम्ही डिक्लेअर करतो की आम्ही सर्व मोर्चा घेऊन येऊ आणि आम्ही सर्व तुमच्या पाठीशी उभे आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हाला हे मंजूर आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, सदर यादी रद्द करण्यासाठी काय प्रोसिजर आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सदर यादी रद्द करण्याचे अधिकार मी उपायुक्त असल्यामुळे वैयक्तिकरित्या माझे नाहीत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, सदर यादी रद्द करण्याची काय प्रोसिजर आहे? ते आम्ही विचारलेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपण सदरहू उमेदवारांना कॉल पाठवलेले आहेत. त्यामुळे आपण ही यादी रद्द करु शकत नाही.

**केशव घरत :-**

आम्ही त्या उमेदवारांना तिकडे यायला देणार नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ही यादी रद्द करण्याची प्रोसिजर कायद्यामध्ये आयडेन्टीफाय केलेली असेल असे मला वाटत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हे चुकीचे आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सगळ्या उमेदवारांना कॉल केलेले आहेत. मग यादी रद्द कशी करता येईल?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही यादी रद्द करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही यादी रद्द करीत नसाल तर आम्ही यादी रद्द करतो.

**सुर्यकांत भोईर :-**

जर तुम्हाला यादी रद्द करण्याचा अधिकार नसेल तर आम्ही यादी रद्द करतो.

**रतन पाटील :-**

साहेब, उमेदवारांची यादी रद्द केल्याची बातमी पेपरला द्या. नोकरभरतीच्या बातम्या पेपरला सतत येत असतात. सदर नोकरभरती १८ तारखेला ठेवलेली होती. ती भरती काही कारणास्तव रद्द करण्यांत आलेली आहे. अशी सुचना पेपरला द्या. आम्ही तुमच्या पुढे आहोत.

**मोहन पाटील :-**

ही भरती रद्द करण्याचे काहीही कारण नाही. फक्त स्थानिक उमेदवारांना घेतले नाही हेच कारण आहे.

**प्रभात पाटील :-**

स्थानिक उमेदवारांना घेतले नाही हेच कारण आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सकाळी १०.०० वा. सर्व नगरसेवकांनी नगरभवनमध्ये जमायचे आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

आपणसुध्दा या लोकांना भरती कशी होते? ते दाखवायचे.

**रतन पाटील :-**

आमची आघाडी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, सदरहू यादीमध्ये मिरा भाईंदरचे स्थानिक उमेदवार नाहीत आणि सदरहू भरतीमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे सदरहू यादी रद्द करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, सगळ्यांचे अनुमोदन लिहून घ्या.

**प्रभात पाटील :-**

या ठरावाला सगळ्यांचे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

या ठरावासाठी सगळ्यांचे अनुमोदन नमुद करुन घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावाला सगळ्यांचे अनुमोदक असल्याचे नोंद करुन घ्या.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, मला या ठिकाणी एक प्रश्न विचारायचा आहे. आपल्याकडे जी पन्नास लिपिकांची भरती होणार होती. त्याचे काय झाले?

**सुर्यकांत भोईर :-**

पन्नास लिपिकांच्या भरतीचे काय झाले?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पन्नास लिपिकांच्या भरतीबाबत सांगा.

**मा. सभापती :-**

मला तुमच्या भावना समजतात.

**केशव घरत :-**

या ठरावाला प्रत्येक नगरसेवकांनी दोन-दोन नावे द्यायची आहेत असे ठरलेले होते.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही दोन-दोन नावे द्यायचे ठरविलेले होते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने खुलासा करतो की, मागच्या सभेमध्ये किंवा त्याच्या मागच्या सभेमध्ये आपण आवश्यकतेप्रमाणे ठेका पध्दतीने पन्नास लिपिक भरण्याची मंजूरी दिलेली होती. आपण सदरच्या मंजुरीला आपल्याकडे कार्यरत असणाऱ्या ठेकेदाराकडून घेण्याची मान्यता दिलेली आहे. आपण त्या अनुषंगाने आवश्यक ते कामगार रजिस्टर केल्याची खात्री केलेली आहे. त्यांनी त्याप्रमाणे नोंदी करुन आम्हाला अहवाल दिल्यानंतर त्याची कार्यवाही केली जाईल.

**जयंत पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, तुम्ही चुकीची माहिती देत आहात. ही भरती ठेकेदाराकडून झालेली नाही. परिवहनचा ठेकेदार किंवा इतर कुठल्याही ठेकेदाराला या शहरातील कर्मचारी नेमण्याचा अधिकार नाही. तो ठेकेदार व्हेरिफिकेशन करु शकत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

श्री. खतगावकर साहेब, तुम्ही चुकीची माहिती देत आहात.

**ग्रिटा फॅरो :-**

ही भरती ठेकेदाराकडून झालेली नाही.

**जयंत पाटील :-**

आपला स्थायी समितीला एक निर्णय झालेला होता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी स्थायी समितीच्या निर्णयाची प्रत मागवतो.

**जयंत पाटील :-**

तुम्ही निर्णयाची प्रत मागवा.

**मोहन पाटील :-**

आपण त्याबाबत ठराव केलेला होता की, जे निमाजीत ठेकेदार आहेत आपण त्यांना मागच्या वेळेला जो रेट दिलेला होता. त्या रेटमध्ये पन्नास लोकांची भरती करण्याबाबत आपण ठराव केलेला होता. ठराव झालेला आहे.

**जयंत पाटील :-**

तो ठराव चुकीचा झाला आहे.

**केशव घरत :-**

ज्याच्या भु सुरक्षा रक्षकाची भरती झालेली आहे त्याचे काय?

**प्रभात पाटील :-**

परंतु, असाच ठराव झालेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अटीशर्ती सांगा.

**मोहन पाटील :-**

आपण आपले दोन-दोन सदस्य द्यायचे हा वेगळा विषय आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण अधिकाऱ्यांना सांगुन त्याप्रमाणे ठरवू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण ज्याप्रमाणे ठरावाला मंजूरी देतो, आपण त्याप्रमाणे ठराव रद्द करु शकतो.

**मोहन पाटील :-**

म्हणजे आपण आपल्यावतीने दोन-दोन सदस्य द्यायचे आहेत.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, या शहरात जे-जे अधिकारी येतात उदाहरणार्थ श्री. खतगावकर साहेब आलेले आहेत. ज्या-ज्या वेळेला भरती होते, त्या त्या वेळेला यांचे नातेवाईक कसे येतात.

**सुर्यकांत भोईर :-**

प्रत्येक अधिकाऱ्याचे नातेवाईक येतात.

**जयंत पाटील :-**

मी तुमच्यावर आरोप करीत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, तुम्ही या सदनाचे जुने सदस्य आहात. माझे नातेवाईक येतात हे बोलणे तुम्हाला योग्य दिसत नाही.

**जयंत पाटील :-**

मी तुमचे नाव उदाहरणासाठी दिलेले आहे. तुम्ही वाईट वाटून का घेता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

वाईट वाटून घेण्याचा प्रश्न येत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

प्रत्येक अधिकारी बाहेरुन येतात आणि त्यांचे नातेवाईक येतात.

**ज्युडी डिसोझा :-**

त्यांनी या ठिकाणी एक उदाहरण दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

परंतु, मी हे उदाहरण दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

मला तुमचे नाव तोंडपाठ आहे. परंतु, जी वस्तुस्थिती आहे ती मी सांगितलेली आहे.

**मा. सभापती :-**

ही जी अठरा पदे भरायची होती. आपण त्याचा आपण ठराव केलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

आपल्याला लिपिकांची पन्नास पदे भरायची होती.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावावर काय रुलिंग देणार आहोत ते सांगा?

**मोहन पाटील :-**

आपण पन्नास पदांना मंजूरी दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती सहेब, सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी जो ठराव मांडला आणि त्या ठरावाला सन्मा. सदस्यांनी अनुमोदन दिलेले होते. त्याबाबत तुमचे काय रुलिंग आहे ते सांगा?

**मा. सभापती :-**

जी पन्नास पदे भरायची होती त्या ठरावाबाबत तुम्ही बोलत आहात का?

**केशव घरत :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही बोलता त्या ठरावावर रुलिंग नको आहे. परंतु, आता ज्या ठरावावर चर्चा चालू होती त्या ठरावावर रुलिंग हवे आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला हा ठराव या ठिकाणी मांडता येत नाही. कारण हा भाग आपल्या कक्षाचा नसून हा भाग मा. आयुक्त साहेबांचा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही असे कसे बोलता?

**सुर्यकांत भोईर :-**

मग तुम्ही हा ठराव मंजूरीला कसा आणता?

**मिलन पाटील :-**

असे कुठल्याही कायद्यामध्ये नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, तुमचे हे वक्तव्य योग्य नाही.

**मा. सभापती :-**

मी तुमच्या सर्वांच्या मताशी सहमत आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही रंलिंग द्या.

**गजानन भोईर :-**

तुम्हाला जे रुलिंग योग्य वाटेल तुम्ही ते रुलिंग द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही कॉंग्रेस (आय) पक्षाचे अध्यक्ष आहात, स्थायी समितीचे सभापती आहात. तुम्हीसुध्दा विरोध केलेला आहे. त्यामुळे तुम्ही सहकार्य करणार आहात की अपोझ करणार आहात. याबाबात तुमच्या पक्षाची भुमिका जाहिर करा.

**मा. सभापती :-**

मी या ठिकाणी स्थायी समितीचा अध्यक्ष म्हणून बसलेलो आहे. तुमच्या मताशी सहमत आहे याचा काय अर्थ आहे? तुम्ही जे कराल किंवा १८ तारखेला मोर्चा आणून तिथे बसायचे या तुमच्या मताशी मी १०० टक्के सहमत आहे. परंतु, याच्यापेक्षा हा जो आलेला विषय आहे, हा आयुक्तांच्या कक्षातील विषय आहे. आपल्याला या ठिकाणी बोलता येत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ही भरती कशी रद्द करता येते ते तुम्ही मा. आयुक्त साहेबांना विचारा.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही मिरा भाईंदरच्या मुलांचा विचार करा.

**मिलन पाटील :-**

जेव्हा आपत्कलीन परिस्थिती येते तेव्हा स्थायी समितीमध्ये कुठल्याही विषयावर चर्चा करता आपण आपत्कालीन परिस्थितीवर चर्चा करु शकतो. तुम्ही हा विषय आपत्कालीन असल्याचे समजा, जर या भरतीसाठी स्थानिकांना प्राधान्य हवे असेल तर तुम्ही स्थानिक लोकांच्या बाजुने आहात की नाही ते सांगा.

**गजानन भोईर :-**

आज हा विषय शहरात चर्चेचा विषय झालेला आहे.

**मिलन पाटील :-**

हा विषय चर्चेचा असला तर लोक आमच्या तोंडात शेण घालतील.

**जयंत पाटील :-**

आज या भरतीबाबत जे चाललेले आहे. तुमची या गोष्टीला मान्यता आहे का?

**मिलन पाटील :-**

तुमची या विषयाला मान्यता असेल तर सांगा.

**मा. सभापती :-**

मी तुमच्या बाजुने बोलत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही मा. आयुक्त साहेबांना सांगा.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही आमच्या ठरावाशी सहमत आहात की नाही? याबाबत तुम्ही तुमचे रुलिंग द्या. तुम्ही आमच्या ठरावाच्या विरुध्द असाल तर विरुध्द असल्याचे रुलिंग द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही आम्हाला रुलिंग द्या की बाहेरचे लोक आले तर चालतील मग आम्ही काय ती कार्यवाही करु.

**गजानन भोईर :-**

तुम्हाला जसे रुलिंग देता येईल तसे रुलिंग द्या.

**मा. सभापती :-**

तुम्ही भरतीबाबत माहिती होण्यापूर्वी सर्वप्रथम माझे पत्र मा. आयुक्त साहेबांना गेलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती महोदय, येत्या शनिवारी जी नोकरभरती होणार आहे. त्याच्यामध्ये आम्ही सर्व पक्षाचे नगरसेवक हजर राहून भरती करायला देणार नाही. तुम्ही आम्हाला याच्यावर रुलिंग द्या. आम्ही तोपर्यंत मिटींग तहकुब करतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

याच्यामध्ये फक्त मिरा भाईंदरच्या उमेदवारांना घ्यावे. तुम्ही याच्यावर निर्णय द्या.

**मिलन पाटील :-**

तुम्ही याच्यावर रुलिंग द्या. तुम्हाला वाटेल ते रुलिंग द्या. तुम्हाला रुलिंग द्यायला काय हरकत आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही रुलिंग द्याया नाहीतर आम्ही मिटींग तहकुब करु.

**प्रभात पाटील :-**

या विषयावर सभागृहाच्या अतिशय तीव्र भावना आहेत. तुम्ही मिरा भाईंदरच्या उमेदवारांची यादी मागवा आणि नंतर नोकरभरती करुन घ्या.

**गजानन भोईर :-**

मा. आयुक्त साहेबांच्या अधिकारात नाही असे बोलुन मोकळे झाले.

**कैलासबेन जानी :-**

या उमेदवारांना नोकरभरतीमध्ये घ्यायचे की कॅन्सल करायचे ते सांगा?

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही पेपर नोटीस द्या आणि नंतर भरती करा.

**सुर्यकांत भोईर :-**

संपूर्ण मिरा भाईंदरच्या उमेदवारांची यादी मागवा.

**गजानन भोईर :-**

आपण ही यादी थांबवू शकतो का?

**जयंत पाटील :-**

सभा तहकुब झाली असल्याचे मांडलेले आहे. तुम्ही पुढच्या वेळेला त्या उमेदवारांचा पत्ता घेऊन या. ते उमेदवार शहरात राहतात का? ते उमेदवार शहरात कुठे राहतात? आम्हाला तो पत्तासुध्दा द्या.

**गजानन भोईर :-**

त्या उमेदवारांनी किती वर्षे एम्प्लॉयमेन्ट कार्डवर नोंद केलेली आहे? ते सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुमच्याकडे जी यादी आलेली आहे. त्याची हिस्ट्री, बायोडेटा, मुळ गांव, सध्याचा पत्ता, त्यांनी एम्प्लॉयमेन्ट एक्सचेंजमध्ये कधी नाव नोंदवलेले आहे त्याची सिरियल कशी आहे? ते सर्व बघा. तुम्ही कायदेशीर काम केलेले आहे. परंतु, सेवायोजन कार्यालयाच्या अधिकाऱ्याने ह्याच्यामध्ये खुप मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. तुम्ही जी यादी मागवलेली होती ती रद्द करावी. उमेदवारांच्या मुलाखाती रद्द कराव्यात. आणि पुन्हा फ्रेश यादी मागवावी व तुम्ही त्या यादीप्रमाणे उमेदवारांचे अपॉइन्टमेन्ट करावे.

**केशव घरत :-**

त्या यादीमध्ये मिरा भाईंदरच्या वास्तव्याचा उल्लेख करा.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या संपूर्ण यादीत मिरा भाईंदरच्या उमेदवारांना प्राधान्य दिलेले असावे. आम्हाला संपूर्ण यादी मिरा भाईंदरच्या उमेदवारांना असावी.

**मा. सभापती :-**

या यादीसाठी बाकीच्या लोकांची एन्क्वायरी होण्यापेक्षा मिरा भाईंदरमधील स्थानिक लोकांची भरती झाली पाहिजे असा मुद्दा मी याठिकाणी मांडतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

आमचेसुध्दा तेच म्हणणे आहे.

**केशव घरत :-**

आमचेसुध्दा तेच म्हणणे आहे.

**गजानन भोईर :-**

साहेब, तुम्हाला याच्यावर रुलिंग द्यावे लागेल.

**मा. सभापती :-**

हा विषय विषयपत्रिकेवर नाही. मग तुम्ही या विषयाचा ठराव कसा मांडता?

**प्रभात पाटील :-**

परंतु, तो विषय नसला तरी आम्हाला तो विषय महत्वाचा वाटतो.

**प्र. सचिव :-**

ही सभा तहकुब झालेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

यादी आणल्याशिवाय सभा तहकुब होऊ शकत नाही.

**जयंत पाटील :-**

प्रथम उमेदवारांची यादी आणल्यानंतर चर्चा होईल.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भरतीच्या संदर्भात स्थायी समितीच्या सन्मा. सदस्यांनी चर्चा केलेली आहे. त्या चर्चेच्या अनुषंगाने सभागृहाच्या तीव्र भावना आहेत. मी प्रशासनाला या बाबतीत अशी विनंती करतो की, तुम्ही आम्हाला या भरतीविषयी जी माहिती दिलेली आहे. मी त्याबाबत असे सांगेन की, जी पुढची पदे भरायची आहेत. त्याबाबत आयुक्त साहेबांनी माहिती द्यावी. कारण आपण याच्यामध्ये जी अप्रत्यक्ष यादी सेवायोजन कार्यालयाकडून मागवलेली आहे. त्यासाठी जर आमची अजुन भरतीची प्रक्रिया असेल किंवा अजुन काही पदे असतील तर तुम्ही आम्हाला त्याबाबत सविस्तर माहिती द्या.

**केशव घरत :-**

ही ७० पदे आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्हाला या भरतीची माहिती द्या. कारण ही भरती फक्त मिरा भाईंदरमध्ये झाली पाहिजे.

**मोहन पाटील :-**

मी मिरा भाईंदरमधील भरतीबाबत बोलत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मिरा भाईंदरसाठी भरती करताना ते उमेदवार ह्याच्यामधुनच घ्या. नंतर-नंतर बोलू नका.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही तुमचे मत सांगा.

**सुर्यकांत भाईर :-**

आता जी भरती होईल त्याच्यामध्ये मिरा भाईंदरचे उमेदवार असणे आवश्यक आहे. आम्हाला नंतर-नंतर बोलू नका.

**मिलन पाटील :-**

ही भरती रद्द करा. ह्याचे उमेदवार नंतरच्या भरतीसाठी बोलवा आणि पुन्हा भरती करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता जे उमेदवार आहेत. ते पुढच्या भरतीसाठी ॲड करा.

**मिलन पाटील :-**

तुम्ही हे उमेदवार कोणत्या नात्याने मागवणार?

**सुर्यकांत भोईर :-**

आम्हाला निर्णय द्या.

**जयंत पाटील :-**

मुळात आपला विषय काय चाललेला आहे की,  ही यादी तुम्ही मागवा.

**सुर्यकांत भोईर :-**
आपल्याकडे प्रत्येक अधिका-यांची, नगरसेवकांचीसुध्दा मुले आहेत.
**कैलासबेन जानी :-**
या यादीमध्ये भाईंदरचे उमेदवार किती आहेत?
**गजानन भोईर :-**
मा. आयुक्त साहेब, १८ तारखेला नगरभवनला सकाळपासुन हजारो उमेदवार जमा झालेले दिसतील.
**सुर्यकांत भोईर :-**
तुम्ही अधिका-यांना पत्र द्या. नाहीतर आम्ही मिटींग चालवायला देणार नाही.
**प्रेमनाथ पाटील :-**
आपण ही भरती रद्द करण्यासाठी अधिका-यांना का पत्र द्यायचे? हे जे ७० उमेदवार भरणार आहेत, त्याच्यामध्ये स्थानिक उमेदवारांना घ्या.
**सुर्यकांत भोईर :-**
तुम्ही आता जी यादी काढणार आहात, त्याच्यामध्ये स्थानिकांना प्राधान्य देऊया.
**केशव घरत :-**
आपण चाळीस लिपिक मागवलेले आहेत.
**मा. सभापती :-**
ते लिपिक टेम्पररी आहेत.
**सुर्यकांत भोईर :-**
चाळीस लिपिक टेम्पररी आहेत.
**केशव घरत :-**
चाळीस लिपिकांना घेऊ द्या.
**मिलन पाटील :-**
ते चाळीस लिपिक टेम्पररी आहेत. एजन्टकडून आलेले आहेत.
**केशव घरत :-**
हे चाळीस लिपिक एजन्टकडून आलेले असले तरी सुरक्षा रक्षकाचे काय झाले? तुम्हाला माहिती आहे. आपण ११४ सुरक्षा रक्षक मागवणार होते. त्यांचा बायोडेटा कुठे आहे?
**मोहन पाटील :-**
आपण सध्या त्या विषयावर बोलत नाही.
**गजानन भोईर :-**
प्रथम हा विषय संपु दे.
**केशव घरत :-**
आता तो विषय चर्चेला नसला तरी तो विषय या विषयाशी संबंधित आहे.
**सुर्यकांत भोईर :-**
तुम्ही विषय बदलु नका. प्रथम या विषयावर चर्चा होऊ द्या.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
हा विषय नंतर घ्या.
**सुर्यकांत भोईर :-**
जर तुम्हाला रूलिंग द्यायचे नसेल तर सभा तहकूब करा.
**मा. सभापती :-**
मिरा भाईंदर शहरातील नगरसेवक-नगरसेविका तुमच्या नोकरभरतीच्या मताशी मी १०० टक्के सहमत आहे. नोकरभरतीसाठी ७० पदे मंजुर आलेली आहेत. मला त्या दिवशी आणखी ४०० पदे भरणार असल्याचे सांगितलेले आहे. मा. आयुक्त साहेब ४०० पदे भरणार असतील. परंतु, ही जी ओपन भरती आहे. आम्हाला त्याच्यामध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य हवे आहे. जर ही पदे शेड्यूल कास्टची असली तर या कारणास्तव पून्हा पडून राहतील आणि या ठिकाणी सर्वानुमते मांडलेला ठराव मी एकमताने पास करतो.
**जयंत पाटील :-**
परंतू, मिरा भाईंदरच्या उमेदवारांची यादी सभागृहासमोर आली पाहिजे.
**प्रभात पाटील :-**
यादी आणण्याचे सुद्धा मंजुर झालेले आहे.
**मिलन पाटील :-**
पुढच्या मिटींगपूर्वी मिरा भाईंदरच्या उमेदवारांची यादी सभागृहापूढे येईल.
**प्र. सचिव :-**
सभा तहकूबीची सुचना मागे घेण्यात येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेबांनी एकदा रूलिंग दिले तर त्यांचे कायदेशीर स्टेटस व्हॅलिड आहे की अनव्हॅलिड आहे. याबाबत सचिवांनी उत्तर द्यावे.

**प्र. सचिव :-**

कुठलाही ठराव मांडताना तो विषय अजेन्ड्यावर असणे आवश्यक असते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याचा अर्थ आम्ही आता मांडलेला ठराव बेकायदेशीर आहे आणि तो व्हॅलिड नाही.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही आपत्कालिन सेवेचा विषय सभेमध्ये घेतो कारण तो विषय अतिशय महत्वाचा आहे.

**प्र. सचिव :-**

मी तुम्हाला कायदेशीर बाजू सांगितलेली आहे.

**मिलन पाटील :-**

आपण आपत्कालिनचा विषय ऐनवेळेला सभेमध्ये चर्चेसाठी ठेवतो आणि त्या विषयावर चर्चा घडवून आणतो.

**प्रभात पाटील :-**

आपण आपत्कालिनचा विषयसुद्धा ऐनवेळेला घेतो. तसाच हा विषय घेतलेला आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही तहकूब विषय मागे घेवू नका. कारण य विषयाला कायदेशीररित्या काहीही अर्थ नाही.

**केशव घरत :-**

जर या विषयाला कायदेशीर अर्थ नसेल तर रूलिंगचा प्रश्न येत नाही.

**जयंत पाटील :-**

जर हा विषय कायदेशीररित्या योग्य नसेल तर मा. सभापतीसाहेबांनी दिलेले रूलिंग बेकायदेशीर आहे.

**प्र. सचिव :-**

मी माझे मत सांगितले. परंतू, या विषयावर मा. साभापती त्यांचे रूलिंग दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जोपर्यंत उमेदवार यादी रद्द होत नाही आम्ही तोपर्यंत स्टँडिंग कमिटीची मिटिंग चालू देणार नाही.

**जयंत पाटील :-**

जर मत कायदेशीर नसेल तर तुम्ही सभा तहकूब मागे घ्या असे सर्व सन्मा. सदस्यांना कसे सांगितले?

**प्र. सचिव :-**

साहेबांनी ठराव मंजुर केला म्हणून मी बोललो क सभा तहकूबीचे रूलिंग मागे घेण्यात येत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

याचा अर्थ ठराव मंजुर आहे.

**गजानन भोईर :-**

याचा अर्थ ही सभा कायदेशीर आहे.

**केशव घरत :-**

ही सभा कायदेशीर आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जोपर्यंत या विषयाचा निर्णय लागत नाही. तोपर्यत सभा होणार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

जोपर्यंत या विषयावर निर्णय लागत नाही. तोपर्यत सभा होणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब तुम्ही सुरूवातीला विरोध केला तुमचे रूलिंग काय आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

हा विषय आयत्या वेळेचा विषय म्हणून घ्या.

**मोहन पाटील :-**

माझा विरोध असण्याचा प्रश्न येत नाही. माझा विरोध भरतीच्या प्रक्रियेला आहे. मझा भरतीच्या प्रक्रियेला विरोध नाही असे मी बोललो नाही. तुमचे म्हणणे असे आहे की या ठिकाणी स्थानिकांची भरती झाली पाहिजे. माझे मा. आयुक्तसाहेबांचे असे म्हणणे आहे की आपण जी यादी मागवणार आहोत त्याच्यामध्ये मिरा भाईंदर शहरातील उमेदवारांची जास्तीत जास्त प्रमाणात भरती झाली पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्याच्यामध्ये मिरा भाईंदरची लोक असली पाहिजेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपले ७० उमेदवार असले पाहिजेत.

**जयंत पाटील :-**

मिरा भाईंदर शहरातील मुलांची १०० टक्के भरती झाली पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मिरा भाईंदरच्या उमेदवारांची १०० टक्के भरती झाली पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

मिरा भाईंदरच्या उमेदवारांची १०० टक्के भरती होणे आवश्यक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जी ६५० उमेदवारांची यादी आलेली आहे. त्याच्यामध्ये आपल्या संपर्कातील आणि मिरा भाईंदरच्या संपर्कातील एकही व्यक्ती नाही. मग तुम्ही हे ॲप्रीशिएट केले तर आपण भरती कशी काय करणार? ते तुम्हीच सांगा.

**ग्रिटा फॅरो :-**

मग आपण ही भरती कशाला करायची?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ही भरती करण्याची गरज काय आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

मिरा भाईंदर मध्ये अधिकारी येतो. त्याची चार पाच माणसे त्याच्या बरोबर येतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, जर तुम्ही सांगत असाल तर आम्ही ठराव पास करतो. परंतु, या भरतीमध्ये मिरा भाईंदरचा किंवा आपला एकही उमेदवार परिचीत नाही. मग ठराव पास करायची कहिही गरज नाही. जर तुम्हाला ठराव पास करायचा असेल तर आम्ही ठराव पास करतो. परंतू, आम्ही आमच्या भावना या ठिकाणी सांगितलेल्या आहेत.

**प्रभात पाटील :-**

आपण आपल्या गाई उपाशी ठेवायच्या आणि इतरांना या कुरणात चारायला बोलावयचे असा प्रकार चाललेला आहे.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, या ठिकाणी सर्व पक्षाची लोक आहेत. विधानसभेची निवडणूक असो, लोकसभेची निवडणूक असो किंवा नगरपालिकेची निवडणूक असो. या निवडणूकीला उभे राहिलेले आमचे आमदार स्थानिक लोकांना नोकऱ्या देउ असे सांगतात. जर आम्ही नोकऱ्या लावू शकलो नाही तर त्या जाहिरनाम्याला काय अर्थ आहे?

**मा. सभापती :-**

बाहेरच्या उमेदवारांना घेउ नये.

**जयंत पाटील :-**

माझे सुद्धा आतापर्यंत तेच म्हणणे आहे.

**मा. सभापती :-**

मागे अशीच दोन चार माणसांची भरती केलेली होती.

**जयंत पाटील :-**

तुम्ही आमच्या जाहिरनाम्याला थोडा अर्थ द्या.

**केशव घरत :-**

जे उमेदवार भरती झालेले आहेत ते अजुनपर्यंत कायम झालेले नाहीत. ५३८ कामगार कायम झाले का? आपल्याकडे त्यांची किती वर्षे सर्व्हिस झालली आहे ते बघा.

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला ५३८ कामगारांबाबत मघाशी सांगितलेले आहे.

**केशव घरत :-**

साहेब, ते कामगार टप्प्याटप्प्याने कायम होणार आहेत.

**मा. आयुक्त :-**

५३८ कामगारांबाबातचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. आज आपण त्याच्यावर भाष्य काय करणार.

**केशव घरत :-**

प्रथम ५३८ कामगारांना परमनंन्ट होउ दे त्यांनी एवढे वर्षे सर्व्हिस केली त्याचे काय करायचे?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घेतली पहिजे की सभागृहामध्ये जो ठराव होतो. आपण त्या ठरावाचा आदर करून तो प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवतो. आपल्याला कायद्यामधील तरतूदीचे पालन करायचेच आहे की तुम्हाला कायद्यातील तरतुदीचे पालन करायचे नाही.

**केशव घरत :-**

कायद्यातील तरतुदीचे पालन करावे लागेल काचद्यातील तरुदीचे पालन न करून चालणार नाही.

**मा. आयुक्त :-**

हा प्रस्ताव शासनाकडे पाठवला असेल आणि जर शासनाकडून तो प्रस्ताव प्रलंबित असेल तर आपण त्या प्रस्तावावर भाष्य करून अर्थ नाही.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २०३ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २०३ :-**

दि. ०९/१२/२००५ व दि. १९/१२/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २१० :-**

दि. ०९/१२/२००५ व दि. १९/१२/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २०४ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. एस्. ए. खान ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे. मा. सभापती महोदय मला या ठिकाणी एक माहिती हवी आहे. आपण पंचिंग मशीन बसविणार आहात. परंतु, जनरली फॅक्टरीमध्ये पंचिग मशीनचा वापर केला जातो. जर आपले कामगार तिथे पंचिंग करून बाहेर निघून गेला तर तुम्हाला कसे समजणार? तो कामगार ऑफीसमध्ये आला पंचिंग केले आणि निघून गेला मग तुम्हाला कसे कळणार?

**मा. आयुक्त :-**

तो कामगार बाहेर जाताना वेळ पंच केली जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपले ईजिनिअर वारंवार साईटवर जात असतात मग वारंवार पंचिंग कसे करणार?

**जयंत पाटील :-**

ते ईजिनियर किंवा कर्मचारी कुठेही गेले तरी आपल्याकडे साईट हा शब्द ठरलेला आहे. तो कर्मचारी आताही साईटवर जातो आणि याच्यापुढेसुद्धा साईटवर जाणार आहे.

**मा. आयुक्त :-**

तो कर्मचारी साईटवर जाताना पंचिंग करुन जाणार नाही. परंतु, तो कर्मचारी मुदत संपल्यानंतर कार्यालय सोडून जाईल तेव्हा पंचिंग करेल.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही एकूण किती पंचिंग मशीन खरेदी करणार आहात?

**प्रभात पाटील :-**

एकच पंचिंग मशिन घेउ द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

एकच पंचिंग मशिन असते.

**गजानन भोईर :-**

मी मिरा भाईंदरचा कर्मचारी आहे. मी येउन पंचिंग करून निघून गेलो. सन्मा. सदस्य जयंत पाटील आले आणि सांगितले माझे कार्ड पंच करून द्या. मी त्यांचे कार्ड पंच करून दिले.

**जयंत पाटील :-**

कोणीही कोणाचेही कार्ड पंच करु शकतो. आपल्याला यासाठी विनाकारण खर्च करण्याची आवश्यकता नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब यांनी मला त्यांचे कार्ड दिले आणि मी त्यांचे कार्ड पंचिंग केले म्हणजे कोणीही कोणाचेही कार्ड पंच करू शकतो.

**मा. आयुक्त :-**

जर पंचिंग मशीन घेतली तर कशाही पद्धतीने पंचिंग करण्याची शक्यता आहे.

**रतन पाटील :-**

आपण पंचिंग मशिनऐवजी थम्बचा उपयोग करायचा म्हणजे पंचिंगच्या जोडीला थम्बसुद्धा असु द्या आणि त्याचप्रमाणे प्रत्येक डिपार्टमेंन्टली रजिस्टर मेंन्टैन करा. या रजिस्टरप्रमाणे प्रत्येक डिपार्टमेंन्टला कर्मचाऱ्याची सही झाली पाहिजे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही थम्ब कसे चेक करणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर आपण थम्बची मशीन वापरली तर दररोज ता कर्मचारी आल्यावर थम्ब मारेल तो तिकडे येईल.

**जयंत पाटील :-**

त्या कर्मचाऱ्याने एकदा थम्ब मारला आणि तो कर्मचारी पुन्हा बाहेर गेल्यावर काय करणार?

**रतन पाटील :-**

परंतु, तिच व्यक्ती राहणार आहे. समजा सन्मा. सदस्य जयंत पाटील यांचे मी कार्ड घेउन आलो आणि थम्ब मारला तर चालणार नाही.

**ग्रेटा फेरो :-**

जर थम्ब असेल तरच ते कार्ड वापरले जाईल.

**जयंत पाटील :-**

त्या कर्मचाऱ्याने थम्ब मारला तर ते कार्ड वापरता येते का?

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील विषय सेम आहे. परंतु याठिकाणी पंचिंग कार्डऐवजी थम्बचा वापर केलेला आहे. तुम्ही तुमच्या विषयावर बोला.

**जयंत पाटील :-**

मला ऐवढेच बोलायचे आहे की तुम्ही थम्ब घ्या किंवा पंचिंग कार्ड घ्या. परंतु, तो कर्मचारी बाहेरच्या बाहेर परस्पर निघून गेला तर प्रॉब्लेम होईल.

**रमेश जैन :-**

वह आठ बजे आकर कार्ड पंच या फिर कार्डपर पंच मार सकता है।

**मोहन पाटील :-**

तो कर्मचारी थम्ब मारून बाहेर जाणार हा विषय वेगळा आहे.

**जयंत पाटील :-**

मीसुद्धा एका फॅक्टरीमध्ये सर्व्हिस केलेली आहे आणि आम्ही हे प्रकार केलेले आहेत. म्हणून मी सांगतो.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही जे प्रकार केलेले असतील ते तुमच्या पूरता मर्यादित राहू द्या.

**जयंत पाटील :-**

अनूभव असल्यामुळे आम्ही बोलत आहोत.

**मा. आयुक्त :-**

प्रशासनाला कुठेतरी गतीमानता यावी प्रशासनाला कुठेतरी शिस्त लागावी. आपण हे मशिन बसविल्यानंतर १०० टक्के शिस्तप्रिय होउ अशातला भाग नाही. परंतु, कहीतरी प्रमाणात सुरूवात होईल.

**एस. ए. खान :-**

प्रशासनामध्ये काहीतरी कंट्रोल होईल.

**केशव घरत :-**

साहेब, माझी याठिकाणी एक शंका आहे. समजा, घोडबंदरला आमचे वॉर्ड ऑफिस आहे. तिथे कर्मचारी सकाळी येतात. त्यांनी इथे हजेरी लावून नंतर ड्यूटीवर जायचे का?

**सुर्यकांत भोईर :-**

प्रत्येक ऑफिसला हजेरी लागते.

**मा. सभापती :-**

मी तुमच्या सर्व शंकांशी सहमत आहे. तरीसुद्धा सांगतो की, जो कर्मचारी घरी असुन त्याची दोन किंवा चार दिवसाची हजेरी लागते त्याच्यावर आळा बसेल हे लक्षात ठेवा.

**रतन पाटील :-**

त्या कर्मचाऱ्यांवर आळा बसेल.

**एस. ए. खान :-**

त्या कर्मचाऱ्यांवर आळा बसेल.

**रमेश जैन :-**

कर्मचाऱ्यांवर कंट्रोल होईल.

**एस. ए. खान :-**

साहेब, कर्मचाऱ्यांची जेवणाची वेळ असते. तीसुद्धा लिहा. कारण आम्ही प्रत्येक वेळी जातो तेव्हा कर्मचारी जेवायला गेले असे सांगितले जाते कर्मचारी किती वेळ जेवायला जातात? तेच कळत नाही.

**गजानन भोईर :-**

मा. आयुक्त साहेंब, कार्ड पंचिंग केले तर त्या कर्मचाऱ्याने ते कार्ड स्वतः जवळ ठेवायचे की ते कार्ड घेउन जायचे.

**प्रभात पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, प्रत्येकाला कार्ड स्वतःजवळ ठेवणे कम्पलसरी करा. मी माझ्याकडील कार्ड तुम्हाला दाखवते. समजा मी हे कार्ड पंचिंग करायला मशिनमध्ये टाकले. त्यानंतर ते कार्ड गळ्यात घालायचे कम्पलसरी करा किंवा हे जे कर्मचारी आहेत त्यांनी हे कार्ड पंच केल्यानंतर ते गळ्यात घालणे कम्पलसरी करा जेणेकरून हे कार्ड त्यांच्याजवळ उपलब्ध राहिल. तुम्ही पालिका कर्मचारी आहात की सर्व सामान्य नागरिक आहात! तुम्ही पालिका कर्मचारी असल्यामुळे हे कार्ड तुम्ही ड्यूटीवर असताना गळ्यात असले पाहिजे. हे कार्ड पालिका कर्मचाऱ्यांच्या कायम गळ्यात राहिल याची सक्ती करण्यात यावी.

**जयंत पाटील :-**

मग पंचिंग उपयोगाची नाही.

**रतन पाटील :-**

आता सन्मा. सदस्य प्रभात पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे व्हायला पाहिजे. जे कर्मचारी उशिरा येतात आणि त्यांचा जो लेटमार्क असतो. तो लेटमार्क काउन्ट झाला पाहिजे.

**एस. ए. खान :-**

लेटमार्क काउन्ट होईल.

**मा. सभापती :-**

मशिनमध्ये लेटमार्क काउन्ट होतो.

**प्रभात पाटील :-**

मशिनमध्ये लेटमार्क काउन्ट होत नाही. तुम्हाला लेटमार्कसाठी रजिस्टर मेंन्टेन करावे लागेल.

**जयंत पाटील :-**

जर तुमच्या ऑफिसचा टायमिंग सकाळी १०.०० वा. चा असेल तर तुम्ही कमीत कमी १०.१५ नंतर मशिन स्टॉप करा म्हणजे पंचिंग होणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपले इंजिनियर परस्पर साईटवर जातात ते सारखे सारखे पंचिंग कसे करतील?

**रतन पाटील :-**

परंतु, साईटवर जाताना महानगरपालिकेच्या गेटवरुनच जातात.

**प्रभात पाटील :-**

हे कर्मचारी जेव्हा सही करतात तिच वेळ या मशिनव्दारे कार्डवर पंच केली जाईल.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही ही जी पंचिंगची पद्धत चालु करणार आहात हे पंचिंग सरसकट सगळ्यांना करणार आहात का? या पंचिंगमध्ये तुमचासुद्धा समावेश आहे का?

**मा. आयुक्त :-**

या पंचिंगच्या पद्धतीमध्ये माझा समावेश नाही.

**रतन पाटील :-**

ह्याच्यामध्ये क्लास वनच्या कर्मचाऱ्यांचासुद्धा समावेश आहे का?

**जयंत पाटील :-**

तुम्ही कुठल्या वर्गाच्या कर्मचाऱ्यांचा पंचिंगच्या पद्धतीमध्ये समावेश करणार आहात?

**मा. आयुक्त :-**

आपला बाकी सगळा स्टाफ आहे त्यांना पंचिंग मशिनचा वापर कम्पलसरी करण्यात येईल.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या स्टाफ मध्ये आयुक्त, उपायुक्त, उपअभियंता यापैकी कोणाला पंचिंगची पद्धत कम्पलसरी करणार ते सांगा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही कुठल्या क्लासपर्यंत पंचिंगची पद्धत कम्पलसरी करणार ते सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

विभागप्रमुखाच्या लेव्हलला जे सगळे अधिकरी असतात त्यांच्यासाठी मस्टर तयार करत नाहीत. शासकीय कर्मचा-यांच्या स्टेटसला मस्टरची फॅसिलिटी नसते. ते रात्री बेरात्री जेव्हा काम ये तेव्हा ते थांबतात. त्यामुळे आपण त्यांना मस्टर देउ शकत नाही. ज्या कर्मचा-यांना मस्टरची पद्धत लागू आहे. त्या सर्व कर्मचा-यांना मस्टर कम्पलसरी आहे.

**जयंत पाटील :-**

हजेरीचे मस्टर कोणाला लागू आहे आणि कुणाला लागू नाही हे आम्हाला माहिती नाही.

**शरदचंद्र बेलवटे :-**

वर्ग १ च्या कर्मचा-यांना मस्टर लागू नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

वर्ग १ च्या खालचे जे कर्मचारी आहेत त्यांना मस्टर लागू आहे.

**मा. सभापती :-**

या पद्धतीमुळे कर्मचा-यांच्या हजेरीवर आळा बसेल.

**एस. ए. खान :-**

हजेरीवर आळा बसेल.

**शरदचंद्र बेलवटे :-**

वर्ग २ ला सुद्धा हजेरी मस्टर नाही.

**प्र. सचिव :-**

वर्ग २ ला सुद्धा मस्टर देण्यात यावे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

ज्यांना हजेरी मस्टर अपेक्षीत नसेल त्या वर्गचा-यांना या यादीमध्ये घेता येणार नाही आणि ज्या कर्मचा-यांना मस्टर अपेक्षित आहे ते सर्व कर्मचारी ह्याच्यामध्ये येतील.

**प्रभात पाटील :-**

तीन लेटमार्क झाले तर एक सी.एल. जाते असा आपला नियम आहे.

**रतन पाटील :-**

तीन लेटमार्क झाले तर एक सी.एल. जाते हे बरोबर आहे.

**मा. आयुक्त :-**

या त्रुटींच्याबाबतीमध्ये प्रशासनाला लेखी किंवा तोंडी स्वरुपात सुचना केल्या तर त्या सुचनांचा आदर केला जाईल. परंतु, आपल्याला ही कार्यप्रणाली राबविणे अत्यंत आवश्यक आहे.

**प्रभात पाटील :-**

आपल्याकडे कर्मचा-यांना अशी सवय आहे की हजेरी मस्टरवर सही करायची किंवा जिथे सही नसेल तिथे 'पी' लावला जातो. आपला हेड ऑफ डिपार्टमेंट त्या ठिकाणी त्या कर्मचा-याची प्रेझेन्टी दर्शवितो अशी पालिकेमध्ये प्रोसिजर आहे. आपले बरेच कर्मचारी दोन तीन दिवस येत नसुन सुद्धा त्यांची याठिकाणी प्रझेन्टी लागली असते. समजा, सचिव श्री. हरेश पाटील हजर राहिले तर ते श्री. गोखले साहेबांकडे कार्ड देउन जातील.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

त्याच्यासाठी टेक्नोलोजी आहे.

**एस. ए. खान :-**

त्यामुळे त्याला कमी प्रेशर होईल.

**प्रभात पाटील :-**

आपण या ठिकाणी तिच प्रोसिजर केली पाहिजे.  कारण आमच्याकडे थम्ब नाही. म्हणून मी सांगते असे होउ नये म्हणून थम्ब आवश्यक करा त्याच्यामुळे या सगळ्या प्रकारांना आळा बसेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपले इंजिनियर कधी कधी घरुन साईटवर सुद्धा जातात. जर त्यांचा १०.०० वा. चा टायमिंग असेल तर काय करणार?

**मा. सभापती :-**

आपण ठराविक वर्गाच्या कर्मचा-यांना हजेरी मस्टर कम्पलसरी करणार आहोत.

**मोहन पाटील :-**

या कर्मचा-यांसाठी हजेरी मस्टर केलेले नाही.

**रतन पाटील :-**

परंतु, इंजिनियरसाठी हजेरी मस्टर आहे.

**दिपक खांबित :-**

आपण इंजिनियरसाठी जे कन्सिडर करु त्याच्यावर डिपेन्ड आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही आम्हाला कारण सांगू नका.

**केशव घरत :-**

आमच्याकडे ठाण्यावरुन येणारे इंजिनियर आहेत. जर त्यांचे काम काजुपाड्यात असेल तर त्यांनी भाईंदरला येउन पुन्हा काजुपाड्याला जायचे का?

**जयंत पाटील :-**

त्यांनी भाईंदरमध्ये रहावे.

**प्रभात पाटील :-**

भाईंदरमध्ये रहायचे.

**रतन पाटील :-**

त्यांनी मिरा भाईंदरचे स्थानिक व्हावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रथम ऑफिसला एन्ट्री करा त्याच्यानंतर साईटला जाण्याची तुम्ही त्यांना सक्ती करा.

**रतन पाटील :-**

साहेब, हा गलती संदर्भात एक महत्वाचा विषय आहे. समजा, आपण आज कॉलर आय.डी. बसवितो आणि आपल्याला ही कॉलर आय.डी. टेलिफोन डिपार्टमेंन्टमधुन फ्री मिळत असेल तर आपण त्याला खर्चाची तरतुद करण्याची गरज नाही.

**दिपक खांबित :-**

आपल्याला त्याच्यासाठी इन्स्टुमेंन्टस आणावे लागतात कारण त्यांचे इन्स्टुमेंन्ट वेगळे असतात.

**रतन पाटील :-**

आपल्याकडे टेलिफोनच्या बाबतीत एवढी गलती आहे की एका एका डिपार्टमेंन्ट मधुन वाटेल तसे अर्धा एक तास फोन केले जातात. हे फोन वरच्या मजल्यावरून खालच्या मजल्यापर्यंत केले जातात. त्याच्यावर काहीतरी निर्बंध असला पाहिजे.

**मा. सभापती :-**

तुम्ही हा कसला विषय आणता?

**रतन पाटील :-**

हा विषय बरोबर आहे.

**मोहन पाटील :-**

आपण गटनेत्यांच्या केबिन मध्ये बसल्यानंतर फोन करतो.

**रतन पाटील :-**

हा सर्व आमचा म्हणजे नागरीकांचा पैसा जात आहे. कोणी वाटेल तसे अर्धा एक तास फोन करतात. ह्याच्यावर कुठेतरी निर्बंध व्हायला पाहिजे. प्रत्येकाला वेगवेगळा फोन द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रत्येकाने ऑपरेटरशी संपर्क साधुन कॉन्टक्ट करावा लागेल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही कॉलर आय.डी. लावून नक्की काय साध्य करणार आहात? तुम्ही फोन करणारच आहात मग व्हॉट इज युज फॉर दीस.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही माझ्या बोलण्याचा अर्थ समजावून घ्या. लोक एक एक तास फोन करत बसतात. त्यामुळे कोणाचा पैसा जातो ते बघा.

**जयंत पाटील :-**

आपल्याला कॉलर आय.डी. लावण्याची काहीही आवश्यकता नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

याचा अर्थ असा होतो की, आपल्याला फक्त इन्स्ट्रुमेंन्ट घेण्याचा खर्च वाढवायचा आहे. परंतु आपल्याला कॉलर आय.डी.चा काहीही उपयोग नाही. फक्त रू. ८०० ते रु. ९०० चा डबा आणायचा आणि तो खर्च वाढवायचा. मग आपण तो खर्च कशाला करायचा?

**रतन पाटील :-**

काम असेल तरच फोन करायचा एरवी फोन करायचा नाही.

**मोहन पाटील :-**

आपण आयडी ड्रॉप करुया.

**प्रभात पाटील :-**

आयडी ड्रॉप करा.

**एस. ए. खान :-**

आयडी ड्रॉप करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही कॉलर आय.डी.साठी दिलेला प्रस्ताव आम्हाला नको आहे. आपल्याला कॉलर आय.डी.चा अधिकारी कोण आहे? त्यामुळे आपण उचलायचा नाही असे होईल कॉलर आय.डी.चा प्रस्ताव काढून फक्त पंचिंग मशिनचा घ्या.

**जयंत पाटील :-**

फक्त पंचिंग मशिनचा प्रस्ताव घ्या.

**प्रभात पाटील :-**

पंचिंग मशिनबाबतचा प्रस्ताव मंजुर झाला हे मला मान्य आहे आणि सर्वांना मान्य आहे. परंतु, मी हरेश पाटील यांच्या केबिनमध्ये जाते तेव्हा त्यांची झेरॉक्स मशिन सतत चालू असते. मी माझ्या निरीक्षणाप्रमाणे सांगितलेले आहे. बऱ्याच डिपार्टमेन्टचे कर्मचारी तिथे झेरॉक्स काढायला जातात. मग आपल्या पालिकेमध्ये फक्त एकच झेरॉक्स मशिन आहे का?

**प्र. सचिव :-**

आपल्या पालिकेमध्ये दोन झेरॉक्स मशिन आहेत. माझ्याकडे जी झेरॉक्स मशिन आहे ती चालू असते.

**प्रभात पाटील :-**

दुसरी झेरॉक्स मशिन कुठे असते?

**प्र. सचिव :-**

दुसरी झेरॉक्स मशिन महासभेच्या सभागृहात असते.

**प्रभात पाटील :-**

परंतु, दुसरी झेरॉक्स मशिन कोणाच्या ताब्यात आहे?

**प्र. सचिव :-**

दुसरी मशिन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात आहे.

**प्रभात पाटील :-**

दुसरी मशिन चालू आहे का?

**प्र. सचिव :-**

दुसरी मशिन बंद आहे.

**रतन पाटील :-**

आपण कॅननची झेरॉक्स मशिन नवीन आणलेली आहे.

**केशव घरत :-**

आमच्या माहितीप्रमाणे फक्त तिसऱ्या मजल्यावर झेरॉक्स मशिन आहे.

**दिपक खांबित :-**

एक झेरॉक्स मशिन सचिवांच्या केबिनला आहे आणि दुसरी झेरॉक्स मशिन महासभेच्या सभागृहाच्या पुढच्या साईडला आहे. म्हणजे प्रेक्षक गॅलरीमध्ये आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, ती मशिन कोणासाठी आहे?

**दिपक खांबित :-**

त्या मशिनचा वापर सगळ्यांसाठी केला जातो.

**प्रेमनाथ पाटील :-**

याचा अर्थ ही मशिन सार्वजनिक आहे.

**केशव घरत :-**

महासभेच्या सभागृहातील प्रेक्षक गॅलरीत असलेली मशिन सगळ्यांसाठी आहे हे आम्हांला माहिती नाही. फक्त तिसऱ्या मजल्यावर मशिन आहे एवढेच आम्हांला माहिती आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हांला प्रेक्षक गॅलरीत असलेले झेरॉक्स मशिन माहिती नाही.

**केशव घरत :-**

या दोन मशिनपैकी एक मशिन बंद आहे.

**प्रभात पाटील :-**

जर सचिव केबिनमधील एकच मशिनचा वापर जास्त प्रमाणात केला जात असल्यामुळे एकाच मशिनवर लोड येतो. सचिव साहेब, तुमची प्रोसिडींगची कामे मागे राहतात आणि बाकीच्या लोकांची कामे होतात. मग तुम्ही तिकडे माणसे का लावत नाहीत? तुम्ही तुमचे काम पेंन्डींग ठेवून बाकीच्या लोकांना काम करायला देण्याबाबत ऑब्जेक्शन का घेत नाही? हा महत्त्वाचा भाग आहे. ती झेरॉक्स मशिन तिथेच पडलेली आहे, हे बरोबर आहे. ती मशिन चालू आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

ती झेरॉक्स मशिन बंद आहे.

**प्रभात पाटील :-**

ती तिथे मशिन पडलेली आहे ते मलासुद्धा माहिती आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये एक-एक झेरॉक्स मशिन द्या. पहिल्या मजल्यावर एक झेरॉक्स मशिन, दुसऱ्या मजल्यावर एक झेरॉक्स मशिन, तिसऱ्या मजल्यावर एक झेरॉक्स मशिन आणि चौथ्या मजल्यावर एक झेरॉक्स मशिन असे डिपार्टमेंटली झेरॉक्स मशिनचे वाटप करा.

**मोहन पाटील :-**

सभागृहात असलेल्या झेरॉक्य मशिनची झेरॉक्स काढण्याची कॅपेसिटी जास्त आहे. त्या मशिनवर सिंगल कॉपी निघत नाही. सिंगल झेरॉक्सची कॉपी फक्त सचिव साहेबांच्या केबीनमधील मशिनमधूनच निघते.

**मा. आयुक्त :-**

आता झेरॉक्स मशिनच्या बाबतीत जो काही मुद्दा उपस्थित झालेला आहे. मी त्या संदर्भात असा खुलासा करु इच्छितो की, सचिव साहेबांकडे जी मशिन आहे ती कार्यरत असते आणि दुसरी मशिन बंद आहे. ती मशिन केव्हापासून बंद आहे ती सांगा आणि ती झेरॉक्स मशिन लवकरात लवकर सुरु करुन त्याच्यावर इतर विभागांची कामे करण्यांत येतील.

**प्रभात पाटील :-**

या संदर्भात आजच्या एका न्युजपेपरने बातमी दिली की, आपण आपल्या मधल्या काळामध्ये झेरॉक्स मशिनच्या निविदा मागविलेल्या होत्या आणि आपण रु. २ लाख ७५ हजारामध्ये दोन मशिन घेतलेल्या होत्या. त्या मशिन कॅननच्या नसून असेम्बल केलेल्या आहेत. आजच्या वृत्तपत्रामध्ये एक बातमी आहे. ती बातमी किती जणांनी वाचली ते मला माहिती नाही. तुमचे त्या संदर्भात काय मत आहे?

**मा. आयुक्त :-**

जर वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आली असेल तर त्या बातमीवर शहानिशा केली जाईल.

**प्रभात पाटील :-**

वर्तमानपत्रामध्ये मशिनची बातमी आहे. त्या सर्व मशिन असेम्बल केलेल्या आहेत आणि कॅनन कंपनीच्या मशिन नाहीत.

**मा. आयुक्त :-**

आपण ज्या कंपनीची मशिन मागविलेली होती किंवा ज्या कंपनीची मशिन मागविण्यासाठी निविदा सुचना प्रसिद्ध केलेली होती, ती निविदा सुचना आणि प्रत्यक्ष पुरविलेली जी मशिन असेल ती मशिन आपण ज्या कंपनीला अधिकृत केले असूल त्यांच्याकडून ती सर्टिफाय करुन घेण्यांत येईल.

**प्रकरण क्र. २०४ :-**

महानगरपालिका मुख्य कार्यालय, प्रभाग कार्यालय व विभागीय कार्यालय येथील कर्मचाऱ्यांना हजेरी करिता ''पंचींग मशीन'' व महानगरपलिकेच्या दुरध्वनीवर ''कॉलर आय.डी. मशीन'' बसविणे बाबत.

**ठराव क्र. २११ :-**

महानगरपालिकेच्या विविध विभागातील कर्मचारी वर्गाच्या कामकाजा करीता कार्यालयात येण्याची व सायंकाळी कार्यालयातुन जाण्याची वेळ नोंदविण्याकरिता ''पंचींग मशीन'' तसेच महानगरपलिकेच्या सर्व दुरध्वनीवर ''कॉलर आय.डी. मशीन'' मुख्य कार्यालय, प्रभाग कार्यालय व विभागीय कार्यालय येथे बसविणे कामी स्थानिक तसेच राज्य स्तरीय वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सर्व संबंधीत इच्छुकाकडुन देकार मागवुन सर्वात कमी व वाजवी दरांचे देकार स्विकारुन त्या देकार धारकाकडून प्रस्तावित काम करुन घेणे व त्या पोटी येणाऱ्या खर्चास तसेच ती रक्कम मंजुर देकार धारकास अदा करणेस ''मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम - ७३, खंड -७(ड)'' अन्वये ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. एस्. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. जयंत पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २०५ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी सभागृहासमोर ठरावाचे वाचन केले.)

**एस्. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**केशव घरत :-**

साहेब, आपण वाहन विभागासाठी ह्यांची जी नेमणुक केलेली आहे. वाहनांची दुरुस्ती योग्य रितीने होते की नाही हे बघण्यासाठी, आपण त्यांची नेमणुक केलेली आहे. आपली गाडी क्र. २७५ मंत्रालयात गेलेली होती. ती गाडी जाता-जाता त्या गाडीचे ऑईल अर्ध्या रस्त्यात कमी झालेले होते, म्हणून ती गाडी थांबली होती. ड्रायव्हर ऑईल टाकण्याबाबत सांगत होता. ऑईल टाकण्यासाठी जे गॅझगेट होते ते उलट लावलेले होते. हा माझ्या समोरचा प्रसंग होता. मग ते लोक काय बघतात? जर महापालिकेला अशा पद्धतीचे नुकसान होत असेल तर काय अर्थ आहे? तुम्ही गाड्या बघा. आता नविन आलेल्या गाड्या आपण अशा ठेवल्या तर त्या गाड्यांची अवस्था बघा. त्याच्यामध्ये काही ॲम्बेसिडर गाड्या आहेत. त्या गाड्या फार जुन्या नाहीत. या गाड्या सन २००२-०३ साली घेतलेल्या ॲम्बेसिडर गाड्या आहेत. तुम्ही एका ॲम्बेसिडर गाडीमध्ये बसा. मग तुम्हांला कळेल की, ही गाडी कुठल्या बॉडीची आहे. आम्हीसुद्धा गाड्या वापरतो. त्यामुळे आम्हांला याची कल्पना आहे. ड्रायव्हर फक्त ड्रायव्हिंग करतात का? आपण ह्याच्यावर जे निरिक्षक नेमलेले होते ते काय करतात? हा माझा प्रश्न आहे.

**मा. सभापती :-**

तुमचा बोलण्याचा काय उद्देश आहे?

**केशव घरत :-**

माझा बोलण्याचा उद्देश असा आहे की, ज्या कोणाची नेमणुक होते. त्यांनी त्या विभागावर देखरेख करायला पाहिजे. तुमच्यासुद्धा गाड्या आहेत, तुम्हांला ह्याच्यामधील माहिती आहे. मग असे व्हायला नको. आपण एखाद्या माणसाची नेमणुक केल्यानंतर तो माणूस काय करतो?

**मा. सभापती :-**

ह्या गाडीचे गॅझगेट उलट होते. ती गाडी जुनी आहे का? त्याच्या इंजिनचे काम केलेले आहे की नाही. ह्यांनी इंजिनचे काम केल्यानंतर गॅसकेट उलट लावलेले आहे का? कदाचित कंपनीवालेसुद्धा उलट गॅसकेट लावू शकतात.

**केशव घरत :-**

साहेब, ती गाडी जुनी आहे आणि त्या गाडीचा नं. २७५ आहे.

**गजानन भोईर :-**

म्हणजे, ती गाडी नवीन नाही. ती गाडी जुनी आहे.

**केशव घरत :-**

ती गाडी जुनी आहे.

**गजानन भोईर :-**

ती गाडी जुनी आहे. ती गाडी रिपेअर झालेली आहे आणि गॅरेजलासुद्धा गेलेली आहे. ते बोलत आहेत की, ती जुनी गाडी आहे.

**केशव घरत :-**

ती गाडी नं. २७५ ची जुनी गाडी आहे.

**मोहन पाटील :-**

ती गाडी कंपनीतून आलेली आहे.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य केशव घरत जुनी गाडी असल्याचे बोलत आहेत आणि तुम्ही कंपनीतून आलेली गाडी आहे असे कसे बोलता?

**केशव घरत :-**

जर ती कंपनीतून आलेली नवीन गाडी असेल तर ऑईल लिक कसे होईल? ते आपल्याला समजले पाहिजे.

**मा. सभापती :-**

नवीन गाडी लिक होत नाही असे नाही.

**केशव घरत :-**

कधी-कधी नवीन गाडीसुद्धा लिक होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभापती साहेब, एखादी गाडी कंपनीकडून चेक-अप केल्यानंतरच गाडी पाठवते. त्यामुळे तो कंपनीवाला उलटा गॅसकेट लावू शकत नाही.

**प्रभात पाटील :-**

त्याच गाडीचे गॅसकेट उलटे कसे लावले?

**केशव घरत :-**

आपण ज्यावेळेला एखाद्या निरिक्षकाची नेमणुक करतो त्यावेळेला ते गॅसकेट चेक करणे त्यांचे काम आहे. गाड्या कुठल्या गॅरेजला रिपेअरिंग केल्या ते त्यांने बघावे.

**मा. सभापती :-**

त्या निरिक्षकाची संपुर्ण जबाबदारी आहे.

**केशव घरत :-**

जर ती जबाबदारी त्या निरिक्षकाची असेल तर त्याने ती पार पाडावी.

**मा. सभापती :-**

ती गाडी त्या गॅरेजला रिपेअर केलेली होती. तुम्ही त्याची चौकशी करा.

**गजानन भोईर :-**

गॅरेजवाल्याची चौकशी नंतर करा.

**प्रभात पाटील :-**

आधी आम्ही सांगितलेल्या गोष्टींची चौकशी करा.

**रमेश जैन :-**

महानगरपालिकामे गॅरेज स्टार्ट किया जाए।

**केशव घरत :-**

आपण महापालिकेचा पैसा असाच संपवायचा का? आपण वाहन विभागावर निरिक्षक नेमलेला आहे. त्या निरिक्षकाने निरिक्षण करणे त्याचे कर्तव्य आहे. आपली गाडी गॅरेजमध्ये गेलेली आहे का? ती गाडी व्यवस्थितरित्या दुरुस्त होऊन आली की नाही हे कळायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

त्या गाडीच्या ड्रायव्हरने गाडी गॅरेजमधून काढतानाच सर्व गोष्टी बघितल्या पाहिजेत.

**केशव घरत :-**

ते ड्रायव्हर गॅरेजमध्ये न जाता इथे गाडी आली तर चेक करु शकतात.

**मा. सभापती :-**

त्या ड्रायव्हरने सकाळी गाडी काढतानाच चेक करुन घ्यायला पाहिजे.

**केशव घरत :-**

ते ड्रायव्हर गॅरेजमध्ये गाडी चेक न करता गाडी इकडे आल्यावर चेक करु शकतात.

**मा. सभापती :-**

तो ड्रायव्हर गाडी काढतानाच त्याने गाडी चेक करायला पाहिजे. आपण ज्यांना या कामासाठी नेमतो त्यांनी त्या ड्रायव्हरला या गोष्टीची वॉर्निंग दिली पाहिजे.

**गजानन भोईर :-**

साहेब, रु. ४,०००/- पगार घेणारा माणूस एवढा कळवळत असेल तर रु. ९,०००/- पगार घेणाऱ्या माणसाने काय केले पाहिजे? ती माणसे रु. ४,०००/- पगार घेतात. तरीसुद्धा त्यांना काळजी आहे. आपण ज्यांना नेमतो त्यांचे काय?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांना पगार जास्त आहे. परंतु, मानधन रु. ४,०००/- आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला मानधन मिळत. परंतु, त्यांना पगार मिळतो.

**सुर्यकांत भोईर :-**

फ्लाय ओव्हरखाली कचऱ्याच्या गाड्या, ट्रॅक्टर वगैरे बंद आहेत. ते रिपेअरिंग होऊ शकत नाही का? त्याच्यामध्ये दोन डंम्पर, एक छोटा टेम्पो, ट्रॅक्टर, जेसीबी या बंद पडलेल्या गाड्या आहेत.

**मा. सभापती :-**

आपण त्याच्यावर नंतर एक खास विषय घेऊ या.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या गाड्या रिपेअरिंग होऊ शकत नाहीत का?

**गजानन भोईर :-**

हा विषय पुढच्या मिटींगला जाऊ दे.

**मा. सभापती :-**

त्या गाड्या रिपेअरिंग का होऊ शकत नाहीत?

**सुर्यकांत भोईर :-**

त्या गाड्या कित्येक महिने तशाच पडलेल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, मी ठराव वाचतो. दि. २६/०८/२००५ ठराव क्र. १०४ अन्वये नियुक्त करण्यंत आलेले श्री. नितीन ना. तेरसे यांची मुदत दि. ३१/०१/२००६ रोजी संपत असल्याने वाहन विभागाकरिता नवीन तांत्रिक ज्ञान अवगत केलेली व्यक्ती उपलब्ध होईपर्यंत वाहन विभागाच्या दृष्टीने होणारी गैरसोय टाळण्यासाठी सध्या कार्यरत असलेल्या श्री. नितीन तेरसेंना ठोक देय रु. ९,०००/- प्रतिमाह मानधनावर तांत्रिक सेवा खंड देऊन नव्याने पाच महिन्याकरिता, म्हणजे आपण गेल्या पाच महिन्यात प्रयत्न केले नाहीत का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते पद मंजुर झालेले नव्हते.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण प्रयत्न केलेले नव्हते का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते पद भरणे बाकी आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही या ठिकाणी पदाचा उल्लेख केलेला नाही. फक्त व्यक्ती उपलब्ध होईपर्यंत असे दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण पद मंजुर केल्याशिवाय व्यक्ती उपलब्ध होऊ शकत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे व्यक्ती उपलब्ध नाही का?

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे व्यक्ती उपलब्ध नसेल तर तुम्ही मागवा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चा ५३(१) मध्ये आपण महासभेला कळविले पाहिजे. ह्यांची नियुक्ती केल्यानंतर माझा विरोध असण्याचे कारण नाही. परंतु, आपण मागच्या वेळेलासुद्धा महासभेला कळविलेले नव्हते. आपण आता हे कळविले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ह्यांची नेमणुक केल्यावर महासभेला कळविणे आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

महासभेला कळविले नाही. या गोष्टीला चार-पाच महिने झालेले आहेत. पाच महिन्यांची नियुक्ती होती.

**कैलासबेन जानी :-**

पाच महिन्यांची मुदत असल्यामुळे हा विषय स्थायी समितीमध्ये का घेतलेला नाही?

**मोहन पाटील :-**

जर पाच महिन्याची मुदत असेल तर आपण हा विषय स्थायी समितीला घ्यायचा असतो. पाच महिन्यापेक्षा जास्त मुदत असेल तर हा विषय महासभेकडे जाईल.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, तुम्ही जे काही बोलता ते मला योग्य वाटत नाही. तुम्ही कलम ५३(१) बघा. मी तो कलम वाचलेला आहे.

(प्र. सचिवांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) चे सभागृहासमोर वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

ह्याच्यामध्ये महापालिकेला कळविले पाहिजे असे आहे. तुम्ही महापालिकेला फक्त कळवायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

स्थायी समितीला असलेल्या अधिकाराप्रमाणे ठरविले तर महापलिकेला कळवायचे आहे.

**कैलासबेन जानी :-**

आपण पाच महिन्याचा कालावधी निश्चित केलेला आहे आणि या ठिकाणी सहा महिन्याच्या कालावधीचा उल्लेख केलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, मी तुमच्या मुद्यावर खुलासा करु इच्छितो की, आपण आता जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, जर आपल्याला त्या संदर्भात सलग नेमणुक करायची असेल तर त्यासाठी महासभेपुढे प्रस्ताव पाठवावा लागतो. परंतु, आपण ही सेवा खंडीत केलेली आहे.

**जयंत पाटील :-**

ही नविन नेमणुक केलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

जेव्हा अशा प्रकारच्या नेमणुका केल्या जातात तेव्हा त्या नेमणुका महासभेकडे पाठविल्या जातात.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी सहा महिन्याहून अधिक नसलेल्या नेमणुका असा उल्लेख केलेला आहे. तुम्हांला या नेमणुकांबाबत कळविले पाहिजे. अशी-अशी नेमणुक झालेली आहे असे तुम्ही महापालिकेला कळविले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला ही नेमणुक महासभेच्या माहितीसाठी ठेवता येईल.

**मा. सभापती :-**

हा विषय मंजुर आहे. हा विषय पुढच्या महासभेला कळविण्यांत येईल.

**प्रकरण क्र. २०५ :-**

वाहन विभागाकरीता वाहन विषयक तांत्रिक ज्ञान अवगत असलेला (कनिष्ठ अभियंता) कर्मचारी नियुक्त करणे बाबत.

**ठराव क्र. २१२ :-**

महानगरपालिकेच्या स्वतंत्र वाहन विभागा अंतर्गत अनेक प्रकारची वाहने असून त्या वाहनांची देखरेख, देखभाल दुरुस्ती करतांना खूपच अडचणी येत असून सध्या कनिष्ठ अभियंता (यांत्रिक) किंवा तत्सम पद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजूर नाही. दि. २९/०४/२००२ रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. ७१ चे अनुषंगाने दि. ११/१०/२००२ रोजी पद निर्मिती प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. परंतु, त्यास अद्याप मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे वाहन विभाग प्रमुखाचे अभिप्रयानुसार दि. ७/८/२००५ चे दै. सकाळ / सा. सुरजप्रकाश मध्ये जाहिर निविदा मागवून त्या प्राप्त निविदानुसार श्री. नितिन ना. तेरसे B.E. (Mechanical) यांची पाच महिन्याकरिता रु. ९,०००/- या मानधनावर दि. १/९/२००५ पासून वाहन विभागात देखरेख, देखभाल यावर नियंत्रण ठेवणेसाठी नेमणुक केली होती. त्यानुसार त्यांनी काम केले आहे. त्यांची मुदत दि. ३१/१/२००६ रोजी संपत असून दि. १९/१/२००६ रोजी वाहन विभाग प्रमुख यांनी वाहनाची दुरुस्ती करणेसाठी वार्षिक निविदा मागविणे तसेच ठेकेदाराकडून दुरुस्त केलेली वाहने योग्य रित्या केलेली आहेत याबाबत खात्री करणे तसेच वाहन चालक यांनी वेळोवेळी प्रस्तावित केलेली वाहन दुरुस्तीची खातरजमा करणे, दुरुस्त केलेल्या वाहनाचे निरिक्षण करणे इ. कामे करण्यासाठी मा. स्थायी समिती सभा दि. २६/८/२००५ ठराव क्र. १०४ अन्वये नियुक्त करण्यात आलेले श्री. नितिन ना. तेरसे यांची मुदत दि. ३१/१/२००६ रोजी संपत असल्याने वाहन विभागाकरीता नविन तांत्रिक ज्ञान अवगत केलेली व्यक्ती उपलब्ध होईपर्यंत वाहन विभागाचे दृष्टीने होणारी गैरसोय टाळणेसाठी सध्या कार्यरत श्री. नितिन ना. तेरसे यांना पुढे पूर्वीचेच ठोक देय रु. ९,०००/- प्रति माह मानधनावर दि. १५/२/२००६ पासून नव्याने पाच महिन्याकरीता करार करुन नेमणुक करण्यांस वित्तीय व प्रशासकिय मान्यता देण्यात येते. सदर नेमणुकीची मा. महासभेला माहिती देण्यात यावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २०६ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

साहेब, हा धोरणात्मक निर्णय आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, प्रथम ठराव क्र. ७३ वाचून दाखवा आणि नंतर या विषयाचा ठराव मांडा. स्थायी समितीला पास झालेला कोणता ठराव ओ ते समजू द्या. नंतर तुम्ही ठराव करा. आम्ही तुम्हांला वेळ देतो.

(सन्मा. सदस्य श्री. एस्. ए. खान ह्यांनी सभागृहासमोर ठरावाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, हा चुकीचा विषय आहे.

**केशव घरत :-**

हा चुकीचा ठराव आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्हांला हा विषय पटतो का? ठराव कधी झालेला आहे आणि त्याची पुर्तता कधी करता? मला स्थायी समितीचा ठराव क्र. ७३ वाचून दाखवा. नंतर पुढील विषय घेण्यांत यावा.

**कैलासबेन जानी :-**

मा. सभापती साहेब, उपसभापतीच्या पदाला गाडी घ्यायचा हक्क महानगरपालिकेला आहे का? कारण कुठल्याही नगरपालिकेला असा हक्क नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, सभापती आणि उपसभापतींना गाडी देण्याची अधिनियमात तरतुद आहे का?

**कैलासबेन जानी :-**

उपसभापतींना गाडी देण्याची तरतुद कुठल्याही महानगरपालिकेमध्ये नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हांला माहिती आहे. परंतु, सर्वांना माहिती पडण्यासाठी आम्ही विचारतो.

**रतन पाटील :-**

तरतुद आहे की, नाही ते आम्हाला माहिती आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण सभापती आणि उपसभापतींची नेमणुक करतो. त्यामुळे तरतुद आहे की नाही हे माहिती असणे आवश्यक आहे.

**प्रभात पाटील :-**

सभापती आणि उपसभापतींना गाडी आहे की नाही याबाबत सचिवांनी डायरेक्शन दिले पाहिजे.

**कैलासबेन जानी :-**

सचिव साहेब, तशी तरतुद आहे की नाही याचा प्रथम खुलासा करावा.

**प्र. सचिव :-**

मा. आयुक्तांकडून गोषवारा आलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

कायद्याने असे होत नाही.

**रमेश जैन :-**

आपने कानुन बनाया और आप उसके पहले पैसा दे रहे है।

**रतन पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी ह्याबाबत खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

आपण या विषयाशी संबंधित ठराव बघून घेऊ या.

**कैलासबेन जानी :-**

कुठल्याही महापालिकेत असे नाही.

**गजानन भोईर :-**

हा निर्णय स्थायी समिती घेऊ शकते का?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ठराव क्र. ७३ काय आहे? त्या ठरावात काय नमुद केलेले आहे ते बघितल्यानंतर निर्णय घेऊ या.

**प्रभात पाटील :-**

आपल्या महानगरपालिकेमध्ये उपसभापती हे पद मंजुर आहे.

**रतन पाटील :-**

उपसभापतींना मानधन आणि गाडी दिली जात नाही.

**एस्. ए. खान :-**

आपण यावर्षी गाडी दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

आज एवढ्या समित्या केलेल्या आहेत त्या समित्यांमधील प्रत्येक जण गाडी मागणार आहे.

**मोहन पाटील :-**

त्यांच्या मागणीनुसार त्यांना वाहन दिले जाईल.

**रतन पाटील :-**

वरचा मजला रिकामी आहे. तुम्ही तिथे केबिन करा.

**गजानन भोईर :-**

आपली रु. २८० कोटीची तरतुद कमी आहे का?

**कैलासबेन जानी :-**

मग केबिन करुन केबिनमध्येच बसा.

**एस्. ए. खान :-**

आपण त्यांनासुध्दा द्यायचे.

**रतन पाटील :-**

तुम्ही त्यांनासुध्दा गाडी द्या.

**गजानन भोईर :-**

आपण वर्करला काय द्यायचे बोललो की, आपल्या महानगरपालिकेला त्याचा बोजा होतो. परंतु, आपण यांना गाड्या द्यायच्या म्हटल्या की आपण लगेच गाड्या देतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण प्रभाग समित्यांना गाड्या देतो.

**गजानन भोईर :-**

आपण महिला व बालकल्याण समिती सभापती व उपसभापतींना गाड्या देऊ शकतो का?

**मा. सभापती :-**

आपण एकाला गाडी दिल्यानंतर आपल्याला इतरांनासुध्दा गाडी द्यावी लागेल.

**रतन पाटील :-**

कायद्याप्रमाणे गाड्या देऊ शकतो का? मा. सभापती किंवा मा. उपसभापतींना गाड्या देणे कुठल्या कायद्यात बसते आणि कुठल्या अधिनियमात बसते ते दाखवा. तुम्ही ठराव मांडण्यापुर्वी अधिनियम दाखवा.

**मा. आयुक्त :-**

महिला व बालकल्याण समिती कायदेशिर आहे.

**कैलासबेन जानी :-**

परंतु, महिला व बालकल्याण समितीला कयदेशिर भत्ता व गाडी मिळत नाही. नवीन नवीन कायदा आणला म्हणून महापालिका दुसरे काम करु शकत नाही असे आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

माझ्या माहितीनुसार उपसभापती हे पद फक्त महिला व बालकल्याण समितीला आहे. बाकीच्या समित्यांना नाही.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६८ चा ठराव क्र. ७३ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

हा ठराव वेगळा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा शासनाचा सन २००१ चा ठराव आहे.

**रतन पाटील :-**

या ठरावात पदाधिका-यांना गाडी द्या असे सांगितलेले आहे. ते कुठले पदाधिकारी आहेत? या ठरावात उपसभापतींना गाडी देण्याबाबत सांगितलेले नाही.

**मोहन पाटील :-**

महिला व बालकल्याण समितीला उपसभापती पद आहे आणि उपसभापती पदाचा समावेश पदाधिका-यांमध्ये होऊ शकतो.

**रतन पाटील :-**

असे होऊ शकत नाही.

**कैलासबेन जानी :-**

असे होत नाही.

**मा. सभापती :-**

तुमचे असे म्हणणे आहे का की, आपण अधिका-यांना गाडी देतो. परंतु, उपसभापती हे अधिका-यांच्या लेव्हलचे नाहीत.

**रतन पाटील :-**

तुम्ही हा ठराव कधी केलेला आहे? तुम्ही ती ठरावाची तारिख बघा.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा ठराव सन २००१ रोजी शासनाने केलेला आहे.

**मा. सभापती :-**

जर उद्या कदाचित तुम्ही सभापती किंवा उपसभापती झाले तर काय करणार?

**रतन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तरीसुद्धा गाडी द्यायची नाही. हा ठराव कधी झाला ते सांगा.

**केशव घरत :-**

त्याची मुदत संपल्यानंतर आत्ता गाड्यांची मागणी केलेली आहे. हा प्रकार कुठला आहे?

**रतन पाटील :-**

मागची मागणी केली तरी आत्ता गाडी द्यायची आहे.

**रमेश जैन :-**

दो साल के बाद माँगणी करने की क्या?

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आम्ही काहीही विरोध करित नाही. परंतु, आजपर्यंत तुम्ही कुठे होतात? तुम्ही आत्ता का मागणी करता? उपसभापती पदावर असतांना मागणी का केली नाही?

**मा. सभापती :-**

परंतु, ठराव आत्ता झालेला आहे.

**गजानन भोईर :-**

आत्ता ठराव झालेला आहे. त्याच्यानंतर त्यांनी गाडी देण्याचा विचार केलेला आहे. आपण त्यांना गाडी देऊ शकत नाही. ठराव नंतर झालेला आहे आणि तुम्ही तसे रुलिंग दिलेले आहे. तुमच्या तोंडातून ठराव नंतर झाल्याचे रुलिंग निघालेले आहे.

**रतन पाटील :-**

आपण गाडी देऊ शकत नाही. ठराव कधी झालेला आहे ते बघा. हा ठराव आत्ता झालेला आहे. आपण मागच्या ठरावाप्रमाणे उपसभापतींना गाडी देऊ शकत नाही.

**कैलासबेन जानी :-**

सचिव साहेब, तुम्ही त्याच्यावर रुलिंग द्या.

**मा. सभापती :-**

याचा अर्थ अधिका-यांना पैसे दिले तर चालतील. नगरसेवकांना पैसे दिले तर चालणार नाही असा तुमच्या बोलण्याचा उद्देश आहे.

**रतन पाटील :-**

आम्ही तसे बोललेलो नाही. तुम्ही ठराव कधी झालेला आहे ते बघा. तुम्ही आत्ता ठरावाचे वाचन केलेले आहे. उपसभापतींना गाडी द्यायची आहे की नाही असा उल्लेख ठरावामध्ये केलेला नाही.

**मोहन पाटील :-**

उपसभापती हे एक प्रकारे पदाधिकारी आहेत.

**एस्. ए. खान :-**

परंतु, उपसभापतींनी कामकाज सांभाळलेले आहे.

**गजानन भोईर :-**

तेव्हाच हा निर्णय घ्यायला पाहिजे होता.

**रतन पाटील :-**

उपसभापतींना गाडी द्यायची नाही असा उल्लेख कुठे केलेला आहे ते सांगा. आम्ही पदाधिकारी सदस्य आहोत. त्यामुळे तुम्ही असे बोलणे योग्य नाही. प्रत्येकाने गाडीची मागणी केलेली आहे. तुम्ही प्रत्येकाला गाडी देणार आहात का?

**मोहन पाटील :-**

महानगरपालिकेतील प्रत्येक सदस्य पदाधिकारी नाही. तो सदनाचा सदस्य आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही चुकीचे बोलत आहात.

**मोहन पाटील :-**

प्रत्येक सदस्य पदाधिकारी नसतो.

**रतन पाटील :-**

आज ह्या स्थायी समितीचे तुम्ही सभापती आहात. मग आम्ही कोण आहोत? सदस्य आहोत की पदाधिकारी आहोत?

**मोहन पाटील :-**

तुम्ही स्थायी समितीचे सदस्य आहात.

**रतन पाटील :-**

तुमच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही स्थायी समितीचे सदस्य आहोत. परंतु, आम्ही स्थायी समितीचे पदाधिकारी आहोत.

**कैलासबेन जानी :-**

सचिव साहेब, जर एखाद्या समितीचे कोणी उपसभापती असतील तर त्यांना गाडी द्यायची प्रोव्हिजन आहे का?

**केशव घरत :-**

माझा असा प्रश्न आहे की, ज्यावेळेला श्रीम. उमा सपार ह्या महिला व बालकल्याण समितीच उपसभापती पदी होत्या त्यावेळेला त्यांनी मागणी का केलेली नव्हती? त्यांनी हा विषय मुदत संपल्यानंतर म्हणजे आता का आणलेला आहे?

**कैलासबेन जानी :-**

उपसभापतींना गाडी द्यायची तरतुद कायद्यामध्ये आहे का, हे मा. आयुक्त साहेबांनी सांगावे.

**एस्. ए. खान :-**

कायद्यामध्ये गाडी द्यायची तरतुद आहे.

**कैलासबेन जानी :-**

परंतु, उपसभापतींना गाडी द्यायची तरतुद कायद्यामध्ये नाही.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेच्या कायद्यामध्ये ज्या तरतुदी आहेत. त्या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे महिला व बालकल्याण समिती ही पदसिद्ध समिती आहे. त्याच्यामध्ये उपसभापतींचासुद्धा समावेश होतो.

**कैलासबेन जानी :-**

महिला व बालकल्याण समितीच्या सभापतींना गाडी द्यायची तरतुद आहे. उपसभापतींना गाडी द्यायची तरतुद नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठाणे महानगरपालिकेमध्ये महिला व बालकल्याण समिती उपसभापती पदी असणाऱ्या महिलांना गाडी दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

ठाणे महानगरपालिकेच्या उपसभापतींना गाडी दिलेली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांना गाडी दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

ठाणे महानगरपालिकेत सभापतींना गाडी दिलेली आहे. ज्यावेळेला महिला व बालकल्याण समितीच्या सभापतींचे काही काम नसेल तेव्हा उपसभापती त्यांची गाडी वापरतात.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्हांला असे वाटते की, आम्हांला माहिती नाही.

**रतन पाटील :-**

तुम्हांला माहिती नाही म्हणून तुम्ही बोलत आहात. तुम्ही उगीचच कमेन्ट पास करु नका.

**प्रभात पाटील :-**

एक महिला सभापती आणि उपसभापतीनी स्वतःचा वेळ खर्च करुन आपल्या समितीचे कामकाज केलेले आहे. त्याच्यामुळे त्यांना गाडी मिळायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

मला हा ठराव योग्य आहे की अयोग्य आहे तेच विचारायचे आहे. हा ठराव बरोबर आहे का? ते तुम्ही सांगा.

**मोहन पाटील :-**

हा ठराव बरोबर आहे.

**गजानन भोईर :-**

हा ठराव बरोबर आहे?

**रतन पाटील :-**

असे चालत नाही. आम्ही इथे काय उगीचच बसलेले आहोत का?

**प्रभात पाटील :-**

या सभापती आणि उपसभापतींनी कार्यमोड आणि पदरमोड केलेली आहे. त्यामुळे त्यांना गाडी मिळणे आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

शासनाचा आदेश सन २००१ मध्ये निघालेला आहे.

**गजानन भोईर :-**

मग तुम्ही तो आदेश मागच्या वेळेला का घेतला नाही?

**जयंत पाटील :-**

सन २००१ नंतरचा हा आदेश असेल किंवा त्यांचा आदेश इकडे आला नसेल.

**केशव घरत :-**

त्यांना आता माहिती पडले का?

**प्रभात पाटील :-**

जर हा आदेश सन २००१ चा असेल तर ते गाडीसाठी पात्र ठरतात.

**केशव घरत :-**

परंतु, असे कसे म्हणत येईल?

**जयंत पाटील :-**

तुम्ही ते पैसे व्याजाने लावणार नाही.

**मोहन पाटील :-**

तुम्हांला व्याजाने पैसे लावायचे नाहीत.

**जयंत पाटील :-**

साहेब, पैशाचे व्याज घेतलेले आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, शासनाचा आदेशाचा ठराव कधी केलेला आहे तो सांगा.

**प्रभात पाटील :-**

साहेब, हा ठराव गेल्या वर्षीचा आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही शासनाचा आदेश काढा आणि बघा.

**रतन पाटील :-**

शासनाचा आदेश सर्वांना वाचून दाखवा.

**केशव घरत :-**

आमच्या याला विरोध नाही. परंतु, त्यांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये गाडी घ्यायला पाहिजे होती. त्यांनी तेव्हा मागणी का केलेली नव्हती?

**रतन पाटील :-**

सदर ठरावाला शिवसेना आणि भाजप सदस्यांचा विरोध आहे. त्यामुळे आम्ही मतदानाची मागणी करीत आहोत.

**केशव घरत :-**

जर या ठरावाला प्रशासनाकडून काही आडकाठी आली तर ती जबाबदारी प्रशासनाने घ्यायची असे ठरवून हा ठराव मंजुर करा.

**मा. सभापती :-**

या ठिकाणी सन २००१ सालचे शासनाचेच परिपत्रक आहे.

**केशव घरत :-**

साहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतु, सभापती आणि उपसभापतींची मुदत संपली असतांनासुद्धा ते गाडी घ्यायला का थांबले होते?

**रतन पाटील :-**

आम्ही शासनाच्या परिपत्रकाबाबत शासनालाच विचारु.

**केशव घरत :-**

तुमचा पगार द्यायचा बाकी होता किंवा पगार मिळाला नाही तर तुम्ही अजुनपर्यंत पगार घेण्यासाठी का थांबले होते? तुम्ही रिटायर झाल्यावर सांगता की, माझ्याकडे तुमचा पगार बाकी आहे. तुम्ही मला माझा पगार द्या हे योग्य आहे का?

**एस्. ए. खान :-**

पगार बाकी असेल तर द्यावा लागेल.

**कैलासबेन जानी :-**

प्रशासनाचीसुद्धा जबाबदारी आहे.

**रतन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, योग्य काय आहे, आणि अयोग्य काय आहे याच्यावर तुम्ही खुलासा करा.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही आत्ता मतदानाची मागणी केलेली आहे का?

**रतन पाटील :-**

आम्ही आत्ता मतदानाची मागणी केलेली आहे. आम्हाला मतदान पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

याबाबत मा. सभापती साहेब, निर्णय देतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा विषय मंजुर करा.

**रतन पाटील :-**

आम्ही कधीही मागणी केलेली नाही. परंतु, हा फार गंभीर विषय आहे. तुम्हांला हा विषय जेवढा सोपा वाटतो तेवढा सोपा नाही. या विषयाबाबत मा. आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**कैलासबेन जानी :-**

यांची जबाबदारी प्रशासन घेईल का?

**रतन पाटील :-**

हा ठराव झाल्यानंतर हे दिले गेलेले आहे. त्यामुळे हे बरोबर आहे की, चुकीचे आहे याबाबत मा. आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी आता जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या बाबतीत ठराव क्र. ७३ हा स्थायी समितीने दि. २६/०७/२००५ रोजी मंजुर केलेला आहे. परंतु, हा जो ठराव झालेला आहे. हा शासन निर्णय वाहन क्र. १०००/प्र.क्र. ६५/२००१, दि. १०/०९/२००१ रोजी शासनाने याबाबतीत निर्णय घेतलेला आहे. हा धोरणात्मक निर्णय घेतलेला असल्यामुळे हा धोरणात्मक निर्णय स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये पाठवला गेलेला होता आणि त्याची अंमलबजावणी तेव्हापासून होईल. जर स्थनिक स्वराज्य संस्थेने हा आदेश मिळाल्यानंतर लगेच ठराव केलेला असेल किंवा उशिरा ठराव केलेला असेल.

**रतन पाटील :-**

परंतु, स्थायी समितीने कधी ठराव केलेला आहे ते सांगा. त्याला डेट नाही का?

**मा. आयुक्त :-**

स्थायी समितीने दि. २६/०७/२००५ रोजी ठराव केलेला होता.

**रतन पाटील :-**

तुम्हांला त्या ठरावाचे महत्व नाही. फक्त शासनाचे जे परिपत्रक आलेले आहे त्यालाच महत्व आहे का?

**मा. आयुक्त :-**

शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे शासनाने सन २००१ मध्ये निर्णय घेतलेला होता. सन २००१ पासून तो भत्ता देय होईल. तो भत्ता स्थानिक स्वराज्य संस्थेने स्विकारल्यानंतर आणि अशा प्रकारचा ठराव पारित केल्यानंतर तो ठराव ठरावाच्या तारखेपासून किंवा शासनाने निर्णय घेतल्याच्या तारखेपासून अंमलात येईल.

**रतन पाटील :-**

साहेब, या तुमच्या खुलाशाला आमचा विरोध आहे. शिवसेना आणि भाजपा सदस्य या ठरावाला मतदानाची मागणी करित आहेत.

**मोहन पाटील :-**

प्रथम खुलासा होऊ द्या. मग मतदानाची मागणी करा.

**रतन पाटील :-**

आम्ही याच्यापुढे जात आहोत. साहेब, हा गुंतागुंतीचा प्रश्न आहे. कदाचित याच्यावर ताशेरे मारले जाण्याची शक्यता आहे. हे सोपे प्रकरण नाही. आम्ही आजपर्यंत कधीही मतदानाची मागणी केलेली नाही. आपण हा गुंतागुंतीचा प्रश्न सोडवला नाही तर ठपका ठेवला जाईल.

**कैलासबेन जानी :-**

आम्ही मतदानाची मागणी नेहमी करित नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्ही विरोध नोंदवून घ्या.

**रतन पाटील :-**

आम्ही मतदानाची मागणी करीत आहोत. तुम्ही आम्हांला विरोध नोंदवायला कशाला सांगता?

**कैलासबेन जानी :-**

विरोध कशाला नोंदवायचा? आपण मतदान करायला सांगू या.

**प्र. सचिव :-**

आम्ही तुमच्या विरोधाची नोंद करुन घेतो.

**रतन पाटील :-**

साहेब, आमचा विरोध आहे. परंतु, आम्ही मतदानाची मागणी करित आहोत.

**मा. सभापती :-**
तुम्ही विरोध दर्शविलेला आहे म्हणून काय झाले?
**प्रेमनाथ पाटील :-**
या सदस्यांच्या विरोधाची नोंद करुन घ्या.
**जयंत पाटील :-**
कोणाचा विरोध आहे ते विचारा आणि त्याची नोंद करुन घ्या.
**गजानन भोईर :-**
आम्हांला फक्त मतदान पाहिजे.
**प्रेमनाथ पाटील :-**
फक्त चार सदस्यांचा विरोध आहे. मग मतदान कशाला पाहिजे? सर्व बाजू पास झाल्या. आत्ता विरोध नोंदवून घ्या.
**जयंत पाटील :-**
फक्त चार सदस्य मतदान करणार आहेत. मग कशाला मतदान हवे?
**मा. सभापती :-**
सन्मा. सदस्य गजानन भोईर, सन्मा. सदस्या कैलासबेन जानी, सन्मा. सदस्य रतन पाटील आणि सन्मा. सदस्य रमेश जैन या चौघांचा विरोध नोंदविण्यांत येत आहे.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, तुमचा मा. आयुक्त साहेबांनी सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास बसलेला नाही का?
**गजानन भोईर :-**
आत्ता तुम्हीच सांगितलेले होते की, हा ठराव नंतर झालेला आहे. तुम्ही असे बोललेसुद्धा आहेत.
**मा. सभापती :-**
सन २००१ मध्ये शासनाचे पत्र आलेले होते.
**गजानन भोईर :-**
शासनाचा आदेश आलेला आहे हे तुम्हांला माहिती नव्हते का?
**मा. सभापती :-**
सन २००१ मध्ये शासनाचा आदेश आलेला होता असे आता तुम्हांला सांगितलेले आहे.
**रतन पाटील :-**
साहेब, सन २००१ मध्ये शासनाचा आदेश आलेला होता. आता सन २००६ चालू आहे.
**मा. सभापती :-**
तुमचा ऐकण्यांत घोटाळा झाला असेल.
**गजानन भोईर :-**
मी तुम्हांला ऐकवून दाखवतो.
**मा. सभापती :-**
सन्मा. सदस्य गजानन भोईर साहेब, तुम्ही पाण्यामध्ये पोहतांना माशाशी वैर बाळगू नका.
**गजानन भोईर :-**
जर तुम्ही कुठलेही शब्द गाळले तर आम्ही मिटींगला बसणार नाही. आम्ही याबाबत आक्षेप घेऊ. कारण या गोष्टीला काहीही अर्थ नाही. तुम्ही बोलता शब्द गाळले जातील याचा अर्थ काय? तुम्ही आता बोलले की, हे शब्द येणार नाही.
**एस्. ए. खान :-**
तुम्ही ऐकायला चुकलेले आहात.
**सुर्यकांत भोईर :-**
यांचा विरोध नोंदवून घ्या आणि ठराव पास करुन टाका.
**रतन पाटील :-**
परंतु, आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे.
**रमेश जैन :-**
हम लोगोने वोटिंग की माँगणी की है।
**एस्. ए. खान :-**
सन्मा. सदस्य गजानन भोईर, ते काय सांगत आहेत आणि तुम्ही काय ऐकत आहात ते लक्षात घ्या.
**रतन पाटील :-**
आम्ही तुमची वेळ वाया घालवत नाही. परंतु, त्या पद्धतीने ठपका येईल तेव्हा कोण जबाबदारी घेणार आहे ते सांगा.

**कैलासबेन जानी :-**

उद्या या गोष्टीची कोण जबाबदारी घेणार आहे? मा. सभापती साहेब जबाबदारी घ्यायला तयार नाहीत आणि मा. आयुक्त साहेब जबाबदारी घ्यायला तयार नाहीत. मा. आयुक्त साहेबांनी जे होते ते वाचलेले आहेत. परंतु, मा. आयुक्त साहेब, जबाबदारी घ्यायला तयार नाहीत.

**मा. सभापती :-**

हा ठराव या ठिकाणी आणला म्हणजे जबाबदारी घेतली जाईलच.

**रतन पाटील :-**

याची कोणीही जबाबदारी घेणार नाही.

**गजानन भोईर :-**

कोणीही जबाबदारी घेणार नाही. तुम्ही ठराव आणला तरी कोणीही जबाबदारी घेणार नाही.

**कैलासबेन जानी :-**

प्रशासन जबाबदारी घेईल का?

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रशासन जबाबदारी घेणार नाही.

**मोहन पाटील :-**

परंतु, हा विषय प्रशासनाकडून आलेला आहे.

**मा. सभापती :-**

हा जास्त मोठा विषय नाही.

**कैलासबेन जानी :-**

मा. आयुक्त साहेबांनी ही सगळी माझी जबाबदारी आहे असे सांगावे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्या कैलासबेन जानी, ह्याच्यावर प्रशासनाचा गोषवारा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, तुम्ही प्रथम गोषवारा वाचा.

**रतन पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी सन २००१ चे परिपत्रक असल्याबद्दल सांगितलेले आहे. परंतु, मा. आयुक्त साहेबांनी ती जबाबदारी घेतलेली नाही. शासनाचे ताशेरे आले तर काय करणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, जरा थांबा. तुम्ही असे कसे बोलता? तुम्ही ठराव वाचलेला नाही. इतकी रक्कम मंजुर करुन अदा करण्यासाठी शिफारस करायची आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, कुठल्याही सभेमध्ये मा. आयुक्त साहेब, हजर असले तर ते त्यांचे मत व्यक्त करु शकतात. ते निर्णय देऊ शकत नाहीत. तुम्ही त्यांना सांगाल की, तुम्ही जबाबदारी घ्या. परंतु, ते जबाबदारी घेऊ शकत नाहीत. या सभेचे पिठासीन अध्यक्षांनी निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यांचा निर्णय महत्त्वाचा आहे. तुम्ही मा. आयुक्त साहेबांना प्रश्न करु शकत नाहीत.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही मतदान घ्या म्हणजे ठराव पास होईल.

**मा. सभापती :-**

ज्या अर्थी हा ठराव पास केला जातो त्या अर्थी तो माणूस जबाबदारी घेऊनच ठराव पास करतो.

**रतन पाटील :-**

साहेब, तसे नसते. ज्या वेळेला आम्ही ठरावाबाबत बोलतो त्यावेळेला आम्हीसुद्धा तुमच्या जोडीला असतो. आम्ही आजपर्यंत विरोध केलेला नव्हता.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही मतदान करा. म्हणजे कळेल. आमचे काम नाही असे आपण बोलू शकत नाही. परंतु, जे कायद्यात बसत नाही ते करायचे नाही. आज दुसरे सभापती आहेत. उद्या आम्ही किंवा तुम्ही सभापती पदावर जाउन बसू शकतो. परंतु, जर तसा कायदा असेल तर आपण कार्यवाही करु शकत नाही.

**मा. सभापती :-**

विषय क्र. २०६ हा बहुमताने मंजुर करण्यांत येत आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही हा विषय बहुमताने मंजुर करता. म्हणजे तुम्ही आम्हांला तुमच्यामध्ये समाविष्ट करुन घेता का?

**कैलासबेन जानी :-**

हा विषय बहुमताने मंजुर होऊ शकत नाही.

**रतन पाटील :-**

आम्ही चौघांनी मतदानाची मागणी केलेली आहे. तुम्हांला मतदान घ्यावे लागेल एवढील आमची तक्रार आहे.

**कैलासबेन जानी :-**

आमचा या विषयाला विरोध आहे. त्यामुळे तुम्ही या विषयावर मतदान घ्या. तुम्हांला हा विषय बहुमताने पास करायचा असेल तर हा विषय बहुमताने पास होणारच आहे. परंतु, तुम्ही या विषयाला मतदान करण्याची तयारी दाखवत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही या विषयासाठी तुमचा विरोध नोंदवा.

**कैलासबेन जानी :-**

आम्ही विरोध कशाला नोंदवायचा? कारण आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही या विषयाला विरोध नोंदवू शकता. त्यामुळे तुम्ही विरोधाची नोंद करुन घ्या. चौघांच्या विरोधाची नोंद करुन घ्या.

**कैलासबेन जानी :-**

असासुद्धा आमचा चार जणांचा विरोध आहे. परंतु, मतदान केले तर बरे होईल.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर, विरोध केला तरी तोच विषय होतो आणि मतदान केले तरी तोच विषय होतो.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही या विषयासाठी मतदान करा. आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे. तुम्ही सभागृहात हा विषय बहुमताने पास करणार आहात. मग मतदान करुन हा विषय बहुमताने पास करुन घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभापती सोब, ह्या विषयाचे काय झाले?

**जयंत पाटील :-**

या विषयाचे काय झाले?

**मोहन पाटील :-**

आपण हा विषय पुढच्या वेळेला घेऊ या.

**रमेश जैन :-**

आमचा या विषयाला विरोध आहे.

**कैलासबेन जानी :-**

हम लोगो ने वोटींग का मॉंगणी किया है।

**मा. सभापती :-**

आपल्याकडे शासनाचे परिपत्रक आहे.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही दोन-तीन महानगरपालिकांना फोन करुन विचारुन घ्या. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका किंवा ठाणे महानगरपालिकेला विचारा.

**मा. सभापती :-**

हा विषय पुढच्या मिटींगला घेण्यांत येईल.

**कैलासबेन जानी :-**

मा. सभापती साहेब, या विषयावर सुधारणा करुन हा विषय पुढच्या मिटींगला आणा.

**प्रकरण क्र. २०६ :-**

मा. सौ. उमा विश्वनाथ सपार, माजी उप सभाती, महिला व बालकल्याण समिती यांना कार्यालयीन वाहन प्रतिपुर्ती भत्ता (वाहना ऐवजी) अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. २१३ :-**

मा. सभापती सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २०७ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

साहेब, विषय क्र. २०७, कामांना मंजुरी देणेबाबत. मिरा भाईंदर महानगरपालिका भाईंदर (पूर्व) विभागात केबिन रोड, साईबाबा मंदिर ते जागृती अपार्टमेंट हा रस्ता खोदून परत बनविण्यात यावा. साईबाबा मंदिर ते जागृती अपार्टमेंट हा केबीन रोडचा रेल्वे पॅरेलल असलेला रस्ता प्रत्येक वेळेला डांबर घालून फार उंच झालेला आहे.

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**केशव घरत :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय सर्वानुमते मंजुर आहे.

**प्रकरण क्र. २०७ :-**

कामांना प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देणेबाबात. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. २१४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विविध विकास कामांची खालिलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यांत आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील अलखनंदा इमारत ते प्लेझंट पार्क पर्यंत गटार बनविणे. | रु. ११,७१,०००/- |
| २ | रा.म.क्र. ८ वरील वर्सोवा जंक्शन ते मॉडर्न झोपडपट्टी पर्यंतचा रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. ४९,३१,३००/- |
| ३ | घोडबंदर येथिल बामनदेव मंदिर ते गोवळादेवी मंदिर पर्यंतचा रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. ४८,८८,६००/- |
| ४ | भाईंदर (पुर्व) गोल्डन नेस्ट डी.पी. रस्ता (सर्व्हे नं. २२९) ते सर्व्हे नं. २२० पर्यंत डी.पी. रस्ता तयार करणे. | रु. ४४,९८,२००/- |
| ५ | रा.म.क्र. ८ वरील सग्नायदेवी मंदिर ते डॉवेल कंपनी पर्यंतचा रस्ता पुर्नःपृष्ठीकरणे करणे. | रु. ४५,२९,७००/- |
| ६ | घोडबंदर बसस्टॉप ते चितबादेवी मंदिर पर्यंतचा रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. ४६,७१,६००/- |
| ७ | रा.म.क्र. ८ वरील अजित पॅलेस हॉटेल ते भानजी उद्योगनगर पर्यंतचा रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. ४०,७९,५००/- |
| ८ | भाईंदर (पूर्व) सर्व्हे नं. २२० ते दिपक हॉस्पीटल डी.पी. रस्त्यापर्यंत (सर्व्हे नं. ३१९) पर्यंत १५.०० मीटर रुंद डी.पी. रस्ता तयार करणे. | रु. ४५,२२,२००/- |
| ९ | उत्तन पाली रोड वाढी काम करणे. | रु. ५,००,०००/- |
| १० | भाईंदर (प.) नाझरेथ उघाडी वाढी काम करणे. | रु. ५,००,०००/- |
| ११ | मुख्य कार्यालय इमारत दालने व इतर, नगरभवन तिसरा माळा फर्निचर वाढी काम करणे. | रु. १९,१२,९४०/- |
| १२ | मिरारोड जॉगर्स पार्क ते स्मशानभुमी ब्रिजपर्यंत उर्वरीत आर.सी.सी. नाल्याचे बांधकाम करणे. | रु. ३७,००,२५०/- |
| १३ | भाईंदर (पूर्व) केबिन रोडवर शालीभद्र इन्क्लेव्हण मथुरा अपार्ट., व्यंकटेश्वर नगर येथे क्रॉस ड्रेन बांधणे. | रु. ३,००,०००/- |
| १४ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर सिग्नल यंत्रणा, केबल्स, पाईप लाईन दुरुस्ती करीता खोदलेले खड्डे बुजविणे. | रु. ५,००,०००/- |
| १५ | भाईंदर (पूर्व) उड्डाणपूल ते रेल्वे फाटक कडे जाणाऱ्या (रेल्वे समांतर) डी.पी. रोडचे काम करणे. | रु. २५,००,०००/- |
| १६ | भाईंदर (पूर्व) केबिन रोड, स्लॅब ड्रेन बांधणे. | रु. ३,५०,०००/- |
| १७ | भाईंदर (पूर्व) स्मशानभुमी ते भोलानगर पर्यंत गटार बांधणे. | रु. ५,००,०००/- |
| १८ | भाईंदर (प.) अमृतवाणी सत्संग ते स्मशानभुमी पर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे उर्वरीत काम करणे. | रु. ५०,००,०००/- |
| १९ | मिरारोड सेंट झेव्हीअर्स स्कूल जवळ कॉलनीकरडे जाणाऱ्या रस्त्यावर उघाडी बांधणे. | रु. ७,५९,१००/- |
| २० | भाईंदर (प.) छत्रपती शिवाजी महाराज मार्ग इंदिरा मार्केट ते रेल्वे स्टेशन पर्यंत रस्त्याचे उर्वरीत काम करणे. | रु. १०,००,०००/- |
| २१ | भाईंदर (प.) सॉल्ट ऑफिस ते प्लॅटफॉर्मकडे जाणारा रस्ता तयार करणे. | रु. १४,९२,०००/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| २२ | पेणकरपाडा पांडुरंग वाडी ते सिम्प्लेक्स मिल पर्यंत उर्वरीत रस्ता रुंदीकरण करुन गटार बांधणे. | रु. ३९,७१,५००/- |
| २३ | वर्सोवा येथे रा.म.क्र. ८ ते पियुषपाणी पर्यंत गटार बांधणे. | रु. ८,५०,०००/- |
| २४ | भाईंदर (प.) स्मशानभुमी रोडवर सब स्टेशन समोर क्रॉस ड्रेन बांधणे. | रु. ५,००,०००/- |
| २५ | पेणकरपाडा येथे जया पार्क ते सुकाळ तलाव पर्यंत सी.सी. रस्ता व गटार बांधणे. | रु. ९,४५,८००/- |
| २६ | पेणकरपाडा सुकाळ तलाव शेजारी गटार बांधणे. | रु. ५,००,०००/- |
| २७ | पेणकरपाडा नताशा पार्क ते सुकाळ तलाव पर्यंत गटार बांधणे. | रु. ५,००,०००/- |
| २८ | भाईंदर (पूर्व) क्विन्स पार्क नं. ७ पासुन मुख्य रस्त्यापर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ५,००,०००/- |
| २९ | भाईंदर (पूर्व) क्विन्स रोज ते पार्क प्लाझा पर्यंत सी.सी. गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ५,००,०००/- |
| ३० | पेणकरपाडा येथिल गणेश मंदिर बसस्टॉप ते सृष्टी सेक्टर-२ पर्यंतचा रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. ४६,८२,९००/- |
| ३१ | भाईंदर (पूर्व) केबीन रोड (प्रशांत हॉटेल ते फाटक चर्च पर्यंत) रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. ४४,३६,१००/- |
| ३२ | चौक धक्का ते चौक भाटी रस्ता तयार करणे. | रु. ४१,५५,०००/- |
| ३३ | घोडबंदर स्मशानभुमी वाढीव काम करुन रस्ता तयार करणे. | रु. ३३,००,०००/- |
| ३४ | मिरारोड रॉयल कॉलेज ते एम.आय.डी.सी. क्रॉस रस्ता खडीकरण करुन डांबरीकरण करणे व गटार बांधणे. | रु. ४०,००,०००/- |
| ३५ | भाईंदर (पूर्व) नवघर इंदिरा नगर उघाडी पर्यंत उर्वरीत नाला बांधकाम करणे. | रु. ४९,५०,०००/- |
| ३६ | भाईंदर (पूर्व) उड्डाणपूल खालील रस्ता नाल्यावर स्लॅब टाकणे व उर्वरीत रस्ता तयार करणे. | रु. ३३,००,०००/- |
| ३७ | घोडबंदर येथे गावातील अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ते दुरुस्ती करणे. | रु. १५,००,०००/- |
| ३८ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (जकात नाका) ते प्लीझंट पार्क कडे जाणारा डी.पी. रस्ता तयार करणे. | रु. ४०,००,०००/- |

वरील अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २०८ चे वाचन केले.)
(सन्मा. सदस्य श्री. एस्. ए. खान ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

तुमच्या पाईपाला प्रेशरच नाही. तुमच्या पाईपमधून पाणी येत नाही.

**मा. सभापती :-**

हा ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. २०८ :-**

कामांना प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देणेबाबात. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. २१५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बऱ्याच विभागामध्ये पाणी पुरवठा करणेसाठी जलवाहिन्या टाकलेल्या नाहीत. तसेच काही ठिकाणी तत्कालीन नगरपरिषदेने टाकलेल्या जलवाहिन्या अपुऱ्या असल्याने त्या ठिकाणी नविन जलवाहिन्या टाकणे गरजेचे आहे. त्यामुळे त्या ठिकाणी व्यवस्थित पाणी पुरवठा करता

येईल. सदरचे काम अत्यावश्यक सेवेतील असून तातडीने करणे गरजेचे आहे. मिरारोड विभागामध्ये जलवाहिनी टाकणे कामांची खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यांत आली.

१) **सिंगपूर प्लाझा ते कॉर्पोरेशन बँकेपर्यंत जलवाहिनी अंथरणेसाठी ३०० मि.मी. व्यासाची बिडाची जलवाहीनी पुरवठा करणे.**
अंदाजित खर्च रु. २७,४३,५१५/-

२) **मिरारोडे वॉर्ड ऑफिस ते पुनम सागर वसाहतीपर्यंत बिडाची जलवाहिनी टाकणेसाठी १५० मि.मी. ते ४०० मि.मी. व्यासाचे पाईप पुरवठा करणे.**
अंदाजित खर्च रु. ४१,४१,०४१/-

३) **सिंगपूर प्लाझा ते कॉर्पोरेशन बँके व मिरा रोड वॉर्ड ऑफिस ते पुनम सागर कॉम्प्पलेक्सपर्यंत मनपाने पुरवठा केलेले पाईप अंथरणे व जोडणे.**
अंदाजित खर्च रु. २२,८४,६३३/-

वरील कामाच्या खर्चाची तरतूद करणे कामी पाणी पुरवठा विभागातील **''स्टेम/मजीप्रा प्राधिकरणास नविन बांधकामास मनपाचा हिस्सा''** यामध्ये रु. १,००,००,०००/- शिल्लक असून **मार्च-२००६ पर्यंत रु. १०,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.** तरी सदर शिर्षातून **''नविन जलवाहिनी टाकणे''** या शिर्षात ९०,००,०००/- वर्ग केल्यास वरील काम करणे शक्य होईल. याबाबतचा तपशिल नमुना क्र. १० नियम ३० नुसार तक्त्यामध्ये माहिती सोबत जोडलेली आहे. तरी वर नमुद केल्याप्रमाणे **''स्टेम/मजीप्रा प्राधिकरणास नविन बांधकामास मनपाचा हिस्सा''** या शिर्षातून **नविन जलवाहिनी टाकणेकरीता** रु. ९०,००,०००/- वर्ग करणेस शिफारस करणेत येत आहे. सबब उपरोक्त **पुर्नविनीयोजनास** तसेच वरील तिन्ही कामे अत्यावश्यक सेवेतील असून तातडीने करणे आवश्यक असल्याने काम क्र. १ व २ साठी आवश्यक बिडाचे पाईप **मे. विंध्या ट्रेडर्स** पुरवठा करीत असलेल्या निविदेअंतर्गत **मंजूर दराने खरेदी करणेसाठी व काम क्र. ३ साठी स्पर्धात्मक निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.**

**सुचक :- श्री. एस्. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २०९ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

अवलोकनाचा विषय मंजुर आहे.

**गजानन भोईर :-**

आम्हांला अवलोकनाच्या विषयावर बोलायचे आहे. आपण जी लावलेली खेळणी होती ती जुनी होऊन बंद पडलेली आहेत. तुम्ही ती खेळणी रिपेअर करणार की बंद ठेवणार आहात? नवघर तलावाचा, दत्त मंदिरचा फवारा बंद आहे.

**जयंत पाटील :-**

दत्त मंदिर समोरील तलावातील फवारा कायम बंद आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, मला एक विचारायचे होते की, तुम्ही काशिमिरा रोडची कामे स्टॉप केलेली आहेत. परंतु, ती सर्व कामे चालू आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर इथे सर्व्हिस रोडला जी कामे चालू आहेत ती तुम्ही बंद केली असे तुम्ही बोलले होते. ती कामे अजुनपर्यंत चालू आहेत.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळील कामाबाबत बोलत आहात का?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपला जो मोठा रस्ता काशिमिरा समोर आहे त्याबाबत मी बोलत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

जो संपूर्ण रोड सिल्व्हर पार्कच्या समोर आणि आजुबाजूचा जो रोड चालू आहे. मी त्या रोडबाबत बोलत आहे.

**मोहन पाटील :-**

हा विषय पुढच्या सभेला घेऊ या.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, तिथे फक्त अहवाल दिले जातील.

**मोहन पाटील :-**

तुम्ही त्यावेळेला सर्व सांगा.

**मा. आयुक्त :-**

तुम्हांला या विषयावर जे काही बोलायचे असेल ते सांगा. मी ऐकून घेतो.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही मागच्या मिटींगला ही कामे बंद असण्याबाबत सांगितले होते. परंतु, ही कामे बंद आहेत. मग कामे चालू कशी आहेत ते मला सांगा.

**मा. आयुक्त :-**

माझ्या माहितीप्रमाणे ती कामे बंद आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

मी तुम्हांला फोटो दाखवू का?

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हांला तेच सांगतो की, जर तुम्ही असे सांगत असाल तर मी स्वतः खात्री करुन घेतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याच्यावर स्टेटस्को आहे का? तेसुद्धा आम्हांला सांगा.

**गजानन भोईर :-**

फक्त दोन दिवस कामे बंद ठेवलेली असतील.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, जकात नाक्याच्या बाजुच्या स्लॅबवर दुकाने टाकलेली आहेत. म्हणजेच टोलनाक्यावर स्लॅबवर चार दुकाने बांधलेली आहेत.

**मा. आयुक्त :-**

जकात नाक्यावर स्लॅबवर दुकानदारांनी गाळे बांधलेले आहेत. जर ते गाळे आपल्या स्लॅबवर असतील ते गाळे विदाऊट नोटीस तोडावे लागतील.

**प्रकरण क्र. २०९ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (वन विभाग)

**ठराव क्र. २१६ :-**

**१) महानगरपालिकेच्या उद्यानामध्ये विविध प्रकारची खेळणी पुरवठा करुन बसविणे.**

महानगरपालिकेच्या विविध उद्यानांमध्ये खालील प्रकारची खेळणी पुरवठा करुन बसविणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामी दि. १३/८/२००५ रोजीची दै. मुंबई संध्या व वृत्तमानस या वृत्तपत्रात जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. ऐशिया इंटरप्रायजेस (दर प्रति नग) | मे. अरिहंत इडस्ट्रीयल कार्पोरेशन लि. (दर प्रति नग) | मे. दिपक एजन्सीज (दर प्रति नग) | मे. ॲटा लिंक (दर प्रति नग) |
|---|---|---|---|---|---|
| १. | ज्वाली स्विंग | रु. ३४,०००/- | रु. ३०,५००/- | रु. ३५,०००/- | रु. ३८,८००/- |
| २. | डस्ट बिंन | रु. ९,४००/- | रु. ६,५००/- | रु. ८,२००/- | रु. ८,५००/- |
| ३. | ग्लायडर | रु. २३,०००/- | रु. १९,५००/- | रु. २१,८००/- | रु. २२,४००/- |
| ४. | वॉकिंग बॅरल | रु. २९,८००/- | रु. २६,१००/- | रु. २८,८००/- | रु.३०,५००/- |
| ५. | रोलर स्लाईड २.१ मी | रु. ७४,८००/- | रु. ६७,२००/- | रु. ७४,६००/- | रु. ७५,०००/- |
| ६. | ॲनिमल एम. जी. आर | रु. ४८,५००/- | रु. ४१,०००/- | रु. ४६,२००/- | रु. ४७,८००/- |
| ७. | प्लॅटफॉम एम.जी आर. | रु. ३७,०००/- | रु. ३२,०००/- | रु. ३५,८००/- | रु. ३६,५००/- |
| ८. | स्प्रिंग रायडर डक | रु. ११,८००/- | रु. ८,४००/- | रु. १०,२००/- | रु. ११,५००/- |
| ९. | स्प्रिंग रायडर पोनी | रु. १२,०००/- | रु. ८,४००/- | रु. १०,५००/- | रु. ११,५००/- |
| १०. | स्पिंग रायडर वेल | रु. १२,०००/- | रु. ८,४००/- | रु. १०,२००/- | रु. ११,५००/- |
| ११. | सर्क्युलर स्वींग असेब्ली | रु. ३०,०००/- | रु. २४,८००/- | रु. २८,८००/- | रु. २९,५००/- |
| १२. | मल्टी सीटर सी सॉ | रु. १७,०००/- | रु. १२,८००/- | रु. १५,५००/- | रु. १६,६००/- |
| १३. | स्प्रिंग रायडर बाईक | रु. १४,०००/- | रु.९,१००/- | रु. ११,२००/- | रु. १२,५००/- |
| १४. | स्पायडर क्लाईबर २.१ मी. | रु. १५,८००/- | रु. ११,८००/- | रु. १३,९००/- | रु. १५,०००/- |

| अ.क्र. | तपशिल | मे. ऐशिया इंटरप्रायजेस (दर प्रति नग) | मे. अरिहंत इडस्ट्रीयल कार्पोरेशन लि. (दर प्रति नग) | मे. दिपक एजन्सीज (दर प्रति नग) | मे. ॲटा लिंक (दर प्रति नग) |
|---|---|---|---|---|---|
| १५. | डिलक्स स्वींग | रु. ३९,०००/- | रु. ३२,५००/- | रु. ३८,०००/- | रु. ३७,५००/- |
| १६. | क्रास ॲन्ड झिरो | रु. ८,९००/- | रु. ६,२००/- | रु. ७,८००/- | रु. ८,२००/- |
| १७. | डबल बार | रु. ९,१००/- | रु. ७,६००/- | रु. ९,३००/- | रु. १०,२००/- |
| १८. | मंकी गोराऊड | रु. २०,०००/- | रु.१६,५००/- | रु. १८,९००/- | रु. १९,५००/- |
| १९. | रॉकींग बोट | रु. ९,८००/- | रु. ७,२००/- | रु. १०,३००/- | रु. ११,०००/- |
| २०. | डिलक्स बेंच | रु. १२,८००/- | रु. १०,६००/- | रु. १४,०००/- | रु. १३,२००/- |

वरील तुलनामत्मक तक्ता पाहता मे. अरिहंत इंडस्ट्रीयल कार्पोरेशन लि. यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे

२) महानगरपालिकेच्या विविध उद्यानांमध्ये मल्टि प्ले सिस्टिम खेळणी पुरवठा करुन बसविणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामी दि. १३/८/२००५ रोजीची दै. मुंबई संध्या व वृत्तमानस या वृत्तपत्रात जाहीर केलेल्या निविदा सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. ऐशिया इंटरप्रायजेस | मे. अरिहंत इडस्ट्रीयल कार्पोरेशन लि. | मे. दिपक एजन्सीज | मे. ॲटा लिंक |
|---|---|---|---|---|---|
| १. | मल्टि प्ले सिस्टिम | रु. २,५४,०००/- | रु. २,२५,०००/- | रु. २,५४,३००/- | रु. २,५६,४००/- |

वरील तुलनामत्मक तक्ता पाहता मे. अरिहंत इंडस्ट्रीयल कार्पोरेशन लि. यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

---

**३) महानगरपालिकेच्या उद्यानांमध्ये विविध प्रकारची खेळणी पुरवठा करुन बसविणे.**

महानगरपालिकेच्या विविध उद्यानांमध्ये खालील प्रकारची खेळणी पुरवठा करुन बसविणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रांतींक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिलेली आहे.

**अ) मोर्वा गाव तलाव उद्यान**

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति नग |
|---|---|---|
| १. | रोलर स्लाइड(२.१ मी.) | रु. ६७,२००/- |
| २. | ॲनिमल एम. जी. आर. | रु. ४१,०००/- |
| ३. | स्प्रिंग राईडर डक | रु. ८,४००/- |
| ४. | स्प्रिंग राईडर पोनी | रु. ८,४००/- |
| ५. | स्प्रिंग राईडर वेल | रु. ८,४००/- |
| ६. | सक्युलर स्वींग असेंब्ली | रु. २४,८००/- |

**ब)महाराणा प्रताप उद्यानामध्ये खेळणी पुरविणे.**

| अ. क्र. | तपशिल | दर प्रति नग |
|---|---|---|
| १ | स्पिंग रायडर डक | रु. ८,४००/- |
| २ | स्पिंग रायडर पोनी | रु. ८,४००/- |
| ३ | स्पिंग रायडर वेल | रु. ८,४००/- |
| ४ | स्पिंग रायडर बाईक | रु. ९,१००/- |
| ५ | रोलर स्लाईड २.१ मी. | रु. ६७,२००/- |
| ६ | ज्वाली स्विंग | रु. ३०,५००/- |
| ७ | मल्टीप्ले सिस्टम | रु. २,२५,०००/- |

**क) राई गाव उद्यान**

| अ. क्र. | तपशिल | दर प्रति नग |
|---|---|---|
| १ | रोलर स्लाइड(२.१ मी.) | रु. ६७,२००/- |
| २ | ॲनिमल एम. जी. आर. | रु. ४१,०००/- |
| ३ | स्प्रिंग राईडर डक | रु. ८,४००/- |
| ४ | स्प्रिंग राईडर पोनी | रु. ८,४००/- |
| ५ | स्प्रिंग राईडर वेल | रु. ८४००/- |
| ६ | ज्वाली स्विंग | रु. ३०,५००/- |

सदरची खेळणी विविध उद्यानांमध्ये बसविण्याकरिता मागील ठेकेदार मे. अरिहंत इंडस्ट्रीयल कॉ. लि. हे मागील दरानुसार खेळणी पुरवठा करण्यास तयार आहेत. त्याबाबत मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

---

**४) महानगरपालिकेच्या उद्यानांमध्ये लालमाती पुरवठा करणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने विकसित केलेली उद्याने, स्मशाने, मैदाने व रोडच्या दुतर्फा झाडांना लागणारी लालमाती खेरदी करणेस मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रातींक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नूसार मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति ब्रास |
|---|---|---|
| १ | लालमाती | ७५०/- प्रति ब्रास |

मागील लालमाती पुरवठा करणारे ठेकेदार मे. भुषण ट्रान्सपोर्ट हे मागील दारानुसार लालमाती पुरवठा करण्यास तयार आहेत.

---

**५) उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागास ट्री कटर खरेदी करणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे चेणा ते उत्तन या विस्तीर्ण परिसरात रोडच्या दुतर्फा झाडे लावलेले असुन सदरच्या झाडांच्या फांद्या छाटणी व आपतकालीन वेळी किंवा जोराच्या वा-या पावसाने झाडे रोडवर पडून रहदारीस अडचण निर्माण होते. त्याकरिता ट्री कटर मशीन आवश्यक असल्यामुळे मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामी दि. १७/११/२००५ रोजीचे दै. वृत्तमानस व दै. सुरज प्रकाश या वृत्तपत्रांत जाहिर केलेली निविदा सुचनेनुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | सागर इटरप्राइजेस | दिक्षा इटरप्राईजेस | क्वालिटी सीड्स ॲन्ड नर्सरी | हर्षद इटरप्राईजेस | मे. ए. एम. नर्सरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | ट्री कटर (मोठे) मॉडेल एम. एस. ६६० डिप्लेसमेंट सी. सी. एम. ९१.६ पॉवर के डब्ल्यु / बी. एच. पी. ५.२/७.१ वेट -७३ के.जी. | ७७,४३५/- **प्र. नग** | ७७,७८५/-**प्र. नग** | ७८,७५०/- **प्र. नग** | ७९,५००/- **प्र. नग** | ८०,०००/- **प्र. नग** |
| २) | ट्री कटर (लहाम) मॉडेल एम. एस. २३० डिप्लेसमेंट सी. सी. एम. ४०.२ पॉवर के डब्ल्यु / बी. एच. पी. ५.२/७.१ वेट -७३ के.जी. | ५०,१०५/- **प्र. नग** | ५४,३५०/- **प्र. नग** | ५३,२८०/- **प्र. नग** | ५२,२००/- **प्र. नग** | ५३,०००/- **प्र. नग** |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. सागर इंटरप्रायजेस यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराचे निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

---

**६) नवघर मराठी शाळा क्र १३ येथील लॅन्ड स्केंपींग करणे.**

महानगरपालिकेच्या नवघर मराठी शाळा क्र. १३ येथे लॅन्ड स्केंपींग करणे आवश्यक असल्याने मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिलेली

आहे. त्यानुसार सदर कामी दि. १७/११/२००५ रोजीची दै. वृत्तमानस व सुरज प्रकाश या वृत्तपत्रांत जाहिर केलेल्या निविदा सुचनेनुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | दिक्षा इटरप्राईजेस | हर्षद इटरप्राईजेस | सागर इटरप्राइजेस | मे. ए. एम. नर्सरी | क्वालिटी सीड्स अॅन्ड नर्सरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | क्रोटन | २४/- प्र. नग | २६/- प्र. नग | २६/- प्र. नग | २८/- प्र. नग | ३०/- प्र. नग |
| २ | गोल्डन धुरांडा | ०९/- प्र. नग | ११/- प्र. नग | १३/- प्र. नग | १३/- प्र. नग | १५/- प्र. नग |
| ३ | जास्वंदी मिक्स | २३/- प्र. नग | २५/- प्र. नग | २८/- प्र. नग | २७/- प्र. नग | २८/- प्र. नग |
| ४ | आरिका पाम | ४८/- प्र. नग | ५१/- प्र. नग | ५१/- प्र. नग | ५३/- प्र. नग | ५४/- प्र. नग |
| ५ | वेली मिक्स | १८/- प्र. नग | २२/- प्र. नग | २४/- प्र. नग | २४/- प्र. नग | २५/- प्र. नग |
| ६ | गोल्डन अरेलिया | २८/- प्र. नग | ३०/- प्र. नग | ३५/- प्र. नग | ३३/- प्र. नग | ३५/- प्र. नग |
| ७ | टेबल पाम | ४६/- प्र. नग | ५०/- प्र. नग | ५०/- प्र. नग | ५३/- प्र. नग | ५५/- प्र. नग |
| ८ | मिनिचर अेक्झोरा | २५/- प्र. नग | २८/- प्र. नग | ३०/- प्र. नग | ३०/- प्र. नग | ३२/- प्र. नग |
| ९ | मधुकामिनी | ४३/- प्र. नग | ५०/- प्र. नग | ५५/- प्र. नग | ५२/- प्र. नग | ५५/- प्र. नग |
| १० | मुसांडा | २८/- प्र. नग | ३२/- प्र. नग | ३२/- प्र. नग | ३४/- प्र. नग | ३५/- प्र. नग |
| ११ | प्लेमेंगो | १४/- प्र. नग | १८/- प्र. नग | २०/- प्र. नग | २०/- प्र. नग | २२/- प्र. नग |
| १२ | लेटिना मिक्स | १४/- प्र. नग | १८/- प्र. नग | २२/- प्र. नग | २०/- प्र. नग | २२/- प्र. नग |
| १३ | बाटल पाम | ५०/- प्र. नग | ५३/- प्र. नग | ५३/- प्र. नग | ५५/- प्र. नग | ५७/- प्र. नग |
| १४ | अतिशोभिवंत मिक्स रोपे | ७३/- प्र. नग | ७६/- प्र. नग | ७८/- प्र. नग | ७८/- प्र. नग | ८०/- प्र. नग |
| १५ | शोभिवंत मिक्स रोपे | ४८/- प्र. नग | ५१/- प्र. नग | ५५/- प्र. नग | ५३/- प्र. नग | ५५/- प्र. नग |
| १६ | वरिल प्रमाणे रोपांची लागवड करण्यापुर्वी ९० से.मी x ९० से.मी. x ९० से.मी.चे खड्डे खोदणे, खोदलेली माती काढुन टाकणे, त्यात चांगल्या व योग्य प्रमाणात किटकनाशक पावडर, वाळू इ. मिश्रण करुन खड्डे भरणे व त्यात वरिल प्रमाणे झाडे लावणे. | १७०/- प्र. नग | १७५/- प्र. नग | १७५/- प्र. नग | १७८/- प्र. नग | १८०/- प्र. नग |
| १७ | दगड व गोटे योग्य उंचीवर सुबक प्रमाणात लावून रॉक गार्डन तयार करणे, त्यात खत, माती इत्यादींची भरणी करुन रचना करणे. | २९००/- प्र. नग | ३०००/- प्र. नग | ३०५०/- प्र. नग | ३०५०/- प्र. नग | ३१५०/- प्र. नग |
| १८ | जमिनीवरचे खड्डे व टेप कटींग / फिलींग करुन जमिनीला लेव्हल करणे. | १.५०/- प्र. चौ.फुट | २.००/- प्र. चौ.फुट | २.६५/- प्र. चौ.फुट | २.२५/- प्र. चौ.फुट | २.५०/- प्र. चौ.फुट |
| १९ | उगवलेले रान मुळासकट उपटून त्याचाच योग्य त्या जागेवर निकाल लावणे. | १.००/- प्र. चौ.फुट | १.५०/- प्र. चौ.फुट | १.८०/- प्र. चौ.फुट | १.८०/- प्र.चौ.फुट | २.००/- प्र.चौ.फुट |
| २० | जंपींग लॉन | २४/-प्र. चौ.फुट | २६/-प्र. चौ.फुट | २६/-प्र. चौ.फुट | २८/- प्र.चौ.फुट | ३०/-प्र. चौ.फुट |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. दिक्षा इंटरप्रायजेस यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराचे निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

---

**७) चिमाजी आप्पा उद्यान येथे लॅन्ड स्केंपींग करणे.**

महानगरपालिकेच्या चिमाजी आप्पा उद्यान येथे लॅन्ड स्केंपींग करणे आवश्यक असल्याने मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामी दि. १७/११/२००५ रोजीची दै. वृत्तमानस व सुरज प्रकाश या वृत्तपत्रांत जाहिर केलेल्या निविदा सुचनेनुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | दिक्षा इटरप्राईजेस | हर्षद इटरप्राईजेस | सागर इटरप्राइजेस | मे. ए. एम. नर्सरी | क्वालिटी सीड्स अ‍ॅन्ड नर्सरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | क्रोटन | २४/- प्र. नग | २६/- प्र. नग | २६/- प्र. नग | २८/- प्र. नग | ३०/- प्र. नग |
| २ | गोल्डन धुरांडा | ०९/- प्र. नग | ११/- प्र. नग | १३/- प्र. नग | १३/- प्र. नग | १५/- प्र. नग |
| ३ | जास्वंदी मिक्स | २३/- प्र. नग | २५/- प्र. नग | २८/- प्र. नग | २७/- प्र. नग | २८/- प्र. नग |
| ४ | आरिका पाम | ४८/- प्र. नग | ५१/- प्र. नग | ५१/- प्र. नग | ५३/- प्र. नग | ५४/- प्र. नग |
| ५ | वेली मिक्स | १८/- प्र. नग | २२/- प्र. नग | २४/- प्र. नग | २४/- प्र. नग | २५/- प्र. नग |
| ६ | गोल्डन अरेलिया | २८/- प्र. नग | ३०/- प्र. नग | ३५/- प्र. नग | ३३/- प्र. नग | ३५/- प्र. नग |
| ७ | टेबल पाम | ४६/- प्र. नग | ५०/- प्र. नग | ५०/- प्र. नग | ५३/- प्र. नग | ५५/- प्र. नग |
| ८ | मिनिचर अेक्झोरा | २५/- प्र. नग | २८/- प्र. नग | ३०/- प्र. नग | ३०/- प्र. नग | ३२/- प्र. नग |
| ९ | मधुकामिनी | ४३/- प्र. नग | ५०/- प्र. नग | ५५/- प्र. नग | ५२/- प्र. नग | ५५/- प्र. नग |
| १० | मुसांडा | २८/- प्र. नग | ३२/- प्र. नग | ३२/- प्र. नग | ३४/- प्र. नग | ३५/- प्र. नग |
| ११ | प्लेमेंगो | १४/- प्र. नग | १८/- प्र. नग | २०/- प्र. नग | २०/- प्र. नग | २२/- प्र. नग |
| १२ | लेटिना मिक्स | १४/- प्र. नग | १८/- प्र. नग | २२/- प्र. नग | २०/- प्र. नग | २२/- प्र. नग |
| १३ | बाटल पाम | ५०/- प्र. नग | ५३/- प्र. नग | ५३/- प्र. नग | ५५/- प्र. नग | ५७/- प्र. नग |
| १४ | अतिशोभिवंत मिक्स रोपे | ७३/- प्र. नग | ७६/- प्र. नग | ७८/- प्र. नग | ७८/- प्र. नग | ८०/- प्र. नग |
| १५ | शोभिवंत मिक्स रोपे | ४८/- प्र. नग | ५१/- प्र. नग | ५५/- प्र. नग | ५३/- प्र. नग | ५५/- प्र. नग |
| १६ | वरिल प्रमाणे रोपांची लागवड करण्यापुर्वी ९० से.मी ़ ९० से.मी. ़ ९० से.मी.चे खड्डे खोदणे, खोदलेली माती काढुन टाकणे, त्यात चांगल्या व योग्य प्रमाणात किटकनाशक पावडर, वाळू इ. मिश्रण करुन खड्डे भरणे व त्यात वरिल प्रमाणे झाडे लावणे. | १७०/- प्र. नग | १७५/- प्र. नग | १७५/- प्र. नग | १७८/- प्र. नग | १८०/- प्र. नग |
| १७ | दगड व गोटे योग्य उंचीवर सुबक प्रमाणात लावून रॉक गार्डन तयार करणे, त्यात खत, माती इत्यादींची भरणी करुन रचना करणे. | २९००/- प्र. नग | ३०००/- प्र. नग | ३०५०/- प्र. नग | ३०५०/- प्र. नग | ३१५०/- प्र. नग |
| १८ | जमिनीवरचे खड्डे व टेप कटींग / फिलींग करुन जमिनीला लेव्हल करणे. | १.५०/- प्र. चौ.फुट | २.००/- प्र. चौ.फुट | २.६५/- प्र. चौ.फुट | २.२५/- प्र. चौ.फुट | २.५०/- प्र. चौ.फुट |
| १९ | उगवलेले रान मुळासकट उपटून त्याचाच योग्य त्या जागेवर निकाल लावणे. | १.००/- प्र. चौ.फुट | १.५०/- प्र. चौ.फुट | १.८०/- प्र. चौ.फुट | १.८०/- प्र.चौ.फुट | २.००/- प्र.चौ.फुट |
| २० | जंपींग लॉन | २४/- प्र. चौ.फुट | २६/- प्र. चौ.फुट | २६/- प्र. चौ.फुट | २८/- प्र.चौ.फुट | ३०/- प्र. चौ.फुट |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. दिक्षा इंटरप्रायजेस यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराचे निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

वरील प्रस्तावाचे अवलोकन करुन ही सभा मंजुरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग आपण सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानुन सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०४.४५ वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**